नागपूर, बुधवार
१ ऑक्टोबर २०२५
वर्ष : ११ अंक : १६७
पृष्ठ : ४ मुल्य : २ रुपये
RNI Reg. No. MAHMAR/2015/61546
Postal Reg.No. NPCity/447/2024-26

# स्वर्णभूमी

मराठी दैनिक
ePepar: www.swarnabhoomi24.com

## यंदाचा गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

स्वर्णभूमी न्यूज



मुंबई – राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पावसाने पिकांचे नुकसान झाले आहे. अजूनही काही भागात पूरस्थिती आहे, त्यामुळे २०२५–२६ या वर्षीचा ऊस गाळप हंगाम राज्यात १ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्री समितीच्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रति टन १० रुपये कपात आणि पूरग्रस्तांच्या मदतीसाठी प्रति टन ५ रुपये कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला.

आज मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २०२४–२५ ऊस गाळप हंगामाचा आढावा आणि २०२५–२६ मधील नवीन गाळप हंगामाचे धोरण ठरविण्यासाठी मंत्री समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी आणि कोकण विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, सामजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे आणि साखर संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यंदा गाळप होणाऱ्या ऊसासाठी बेसिक उतारा १०.२५ टक्के विचारात घेऊन प्रति मेट्रीक टन ३ हजार ५५० रुपये वाजवी लाभदर (एफआरपी) देण्यात येणार आहे. गेल्या हंगामात सुमारे २०० साखर कारखान्यांनी गाळप घेतले असून यामध्ये ९९ सहकारी व १०१ खासगी कारखान्यांचा समावेश होता. शेतकऱ्यांना ३१ हजार ३०१ कोटी रुपयांची एफआरपी अदा करण्यात आली आहे.

राज्याने ९९.०६ टक्के एफआरपी अदा केली आहे. यामध्ये १०० टक्के एफआरपी केलेल्या कारखान्यांची संख्या १४८ आहे. सहवीज निर्मिती प्रकल्पात २०२४ –२५ मध्ये कारखान्यांनी निर्यात केलेली वीज २९८ कोटी युनिट्स असून कारखान्यांना वीज निर्यातीपासून प्राप्त उत्पन्न १९७९ कोटी रुपये आहे. कारखान्यांना इथेनॉल विक्रीपासून ६ हजार ३७८ कोटी रुपये उत्पन्न झाले आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

बैठकीत ऊस तोडणीसाठी यांत्रिकीकरण आणि सहवीज निर्मिती विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सादरीकरण केले. बैठकीपूर्वी केंद्र सरकारने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्ताने, राज्यातील सहकार क्षेत्राची वाटचाल दर्शविणाऱ्या चित्रफितीचे सादरीकरण करण्यात आले.

## आपल्याच लोकांवर कोण गोळीबार करते? सोनम वांगचुक यांच्या पत्नीचा सरकारच्या भूमिकेवर प्रश्न

स्वर्णभूमी न्यूज



लेह – पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना अटक झाल्यानंतर त्यांच्या पत्नी गीतांजली जे. अंगमो यांनी पोलिसांवर टीका केली. सहाव्या अनुसूच–ीचा वापर टाळण्यासाठी आणि एखाद्याला बळीचा बकरा बनवण्यासाठी एक बनावट कथा रचल्याची त्यांनी अटक केली.

गीतांजली जे. अंगमो यांनी पती सोनम वांगचुक यांच्यावर पोलिसांसह सरकारकडून आरोप होत असताना भूमिका स्पष्ट केली. त्या म्हणाल्या, आम्ही डीजीपींच्या विधानांचा तीव्र निषेध करतो. केवळ मीच नाही तर लडाखमधील प्रत्येकजण त्यांनी केलेल्या आरोपांचा निषेध करत आहोत. लेहमधील हिंसाच–ाराच्या घटना अत्यंत दुर्दैवी म्हणत त्यांनी सुरक्षा दलांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. गीतांजली यांनी म्हटलं, सीआरपीएफला गोळीबार करण्याचा आदेश कोणी दिला? स्वत:च्या लोकांवर, स्वत:च्या नागरिकांवर कोण गोळीबार करतं का? विशेषत: कधीही हिंसक निदर्शने झाली नाहीत, अशा ठिकाणी गोळीबार करण्यात आला.

केंद्रीय गृहमंत्रालयानं सोनम वांगचुक यांच्यावर तरुणांना भडकविल्याचा आरोप केला. तसेच त्यांना लेहमधील हिंसाच–ारासाठी जबाबदार धरलं आहे. गीतांजली जे. अंगमो यांनी पतीवर केलेले सर्व आरोप फेटाळले आहेत. त्यांनी म्हटलं, सोनम वांगचुक काय भडकावू शकले असते? त्यांना या सर्व गोष्टींची काहीच माहिती नव्हती. ते उपोषण करत होते.

कोणाला तरी बळीचा बकरा बनवण्याची इच्छा– पोलिसांकडून एका अजेंड्यावर काम सुरू असल्याचा त्यांनी आरोप केला. त्यांनी म्हटलं, डीजीपी एका अजेंड्यावर बोलत आहेत. त्यांना (सरकार) कोणत्याही परिस्थितीत सहाव्या अनुसूच–ीची अंमलबजावणी करायची नाही. त्यांना कोणाला तरी बळीचा बकरा बनवण्याची इच्छा आहे. सरकारनं लागू केलेल्या संचारबंदीचा त्यांनी निषेध केला. सीआ–रपीएफनं अश्रूधुराचा वापर केल्यानं निषेध शांततापूर्ण होऊ शकला नाही, असा त्यांनी दावा केला.

हिंसाचारात ४ जणांचा मृत्यू– २४ सप्टेंबर रोजी झालेल्या हिंसाचारानंतर लेहमध्ये बीएनएसएस २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत सरकारनं प्रतिबंधात्मक आदेश लागू आहेत.हिंसाचाराच्या संदर्भात एकूण ४४ लोकांना अटक करण्यात आली आहे. तर सुरक्षा दलाच्या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यात जमावबंदी लागू असल्यानं पूर्व लेखी परवानगीशिवाय कोणत्याही मिरवणुका, रॅली किंवा मोर्चे काढण्याची परवानगी नाही. लेहमध्ये सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत. लडाखचे रहिवासी संविधानाच्या सहाव्या अनु–सूचीमध्ये केंद्रशासित प्रदेशाचा समावेश करण्याची मागणी करत आहेत.

## स्वत:चे दोन प्लॉट विकून आमदार कडून पूरग्रस्तांना २५ लाखांची मदत

स्वर्णभूमी न्यूज



बुलढाणा – आपल्या वादग्रस्त वक्तव्यांसाठी प्रसिद्ध असणारे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी कधी नव्हे ते संवेदनशील पाऊल उचलले आहे. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी स्वत:चे दोन प्लॉट विकले आहे. संजय गायकवाड यांनी पूरग्रस्तांना जवळपास पंचवीस लाखाची रोख मदत केली आहे.

यंदाच्या पावसाने मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांवर आभाळ कोसळले आहे. शेतजमीन खरडून गेली, पिकांचे मोठे नुकसान झाले. पशुधन वाहून गेले. शेतात मातीही उरली नाही. अशा स्थितीत मदतीचे हात पुढे येत आहेत.

बुलढाणा येथील शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी स्वत:चे मालकीचे दोन प्लॉट विकून नुकसानग्रस्तांना पंचवीस लाखाची मदत देत असल्याचे घोषित केले आहे. यावेळी त्यांच्या दोन प्लॉटच्या विक्रीचे सौदा झाल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले. पंचवीस लाखाची रक्कम देखील त्यांनी पत्रकार परिषदेत आणली होती. ही रक्कम मुंबईला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना ते देणार आहेत.

बुलढाणा मतदारसंघात मोताळा तालुक्यातील खामखेड, गुळभेली, राहेरा, नळकुंड, दाभा, तांडा, उबाळखेड, रोहिणखेड, खेडी, पान्हेरा, कोऱ्हाळा बाजार तसेच बुलढाणा तालुक्यातील गिरडा, चौथा, पाडळी यासह अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात मोठया प्रमाणात पाऊस झाला. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. ही सर्व गावे आमदार संजय गायकवाड यांच्या मतदान संघातील आहेत. त्यामुळे आपले स्वत: चे दोन प्लॉट विकून पूरग्रस्तांना मदत करण्याचा निर्णय आमदार संजय गायकवाड यांनी घेतला. २५ लाखांच्या रकमेसह त्यांनी पत्रकार परिषद घेतली.

कोण आहेत संजय गायकवाड?

–संजय गायकवाड हे शिवसेना पक्षाचे बुलढाणा मतदारसंघाचे आमदार आहेत

–उद्धव ठाकरे सरकारमध्ये ते शांत होते परंतु एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये ते प्रकाशझोतात आले

–सतत वादग्रस्त वक्तव्य करणारे आमदार

–आमदार संजय गायकवाड हे नाव ऐकताच वाद, दमबाजी, कमरेखालची टीका, तोल सुटला हे शब्द समोर येतात

मुंबईत आमदार निवासातील कॅंटीनमधल्या कर्मचाऱ्याला बेदम मारहाण करून ते देशात चर्चेच्या केंद्रस्थानी होते.

## ऊस संशोधनासाठी आयसीएआरमध्ये एक स्वतंत्र पथक

स्वर्णभूमी न्यूज

नवी दिल्ली– केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी देशात ऊस संशोधनासाठी भारतीय कृषी संशोधन परिषदेत (आयसीएआर) एक समर्पित पथक स्थापन करण्याची घोषणा केली. हे पथक ऊस धोरणावरही काम करेल. रुरल व्हॉइस आणि राष्ट्रीय सहकारी साखर महासंघ यांनी आयसीएआरच्या सहकार्याने आयोजित केलेल्या ऊस अर्थव्यवस्थेवरील राष्ट्रीय चर्चेला ते संबोधित करत होते.

चौहान यांनी अधोरेखित केले की उसाच्या २३८ वाणांमध्ये साखरेचे प्रमाण चांगले आहे परंतु त्यात रेड रॉट रोगाचा धोका आहे. पर्याय विकसित करण्यासाठी त्यांनी एकाच वेळी अनेक वाणांवर काम करण्याची गरज अधोरेखित केली. नवीन वाणांमुळे अनेकदा नवीन रोगांचे धोके संभवतात त्यामुळे रोगांवर नियंत्रण ठेवणे हे एक महत्त्वाचे आव्हान आहे असे ते म्हणाले.

त्यांनी निदर्शनास आणून दिले की एकच पीक घेतल्यामुळे अनेक समस्या उद्भवतात, यात पोषक तत्वे कमी होणे आणि नायट्रोजन स्थिरीकरणातील मर्यादा यांचा समावेश आहे. एकच पीक घेण्याऐवजी आंतरपीक घेणे किती व्यवहार्य आहे याचे काळजीपूर्वक मूल्यांकन करणे आवश्यक आहे असे त्यांनी नमूद केले.



''आम्हाला आव्हानांची जाणीव आहे,'' असे चौहान म्हणाले. ''आपल्याला उत्पादन वाढवणे आणि यांत्रिकीकरण करणे, खर्च कमी करणे आणि जास्तीत जास्त साखर मिळवणे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. पाण्याचा वापर ही एक गंभीर समस्या आहे. 'प्रति थेंब, अधिक पीक' या तत्त्वाखाली, आपल्याला पाण्याची आवश्यकता कमी करण्यासाठी धोरणांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर, आपण शेतकऱ्यांवरील आर्थिक भार विचारात घेतला पाहिजे, कारण ठिबक सिंचनासाठी येणारा खर्च लक्षणीय आहे.''

कृषी मंत्र्यांनी जैविक उत्पादनांचे महत्त्व देखील अधोरेखित केले. इथेनॉल आणि मळी यांचे सुस्थापित उपयोग आहेत, परंतु शेतकऱ्यांचा नफा वाढविण्यासाठी नवीन मूल्यवर्धित उत्पादने विकसित करणे आवश्यक आहे असे त्यांनी नमूद केले. खतांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत करण्यासाठी नैसर्गिक शेतीची क्षमता देखील त्यांनी अधोरेखित केली.

चौहान यांनी साखर मूल्य साखळीभोव–तीच्या समस्यांची दखल घेतली आणि सांगितले की शेतकऱ्यांना ऊसाचे पैसे उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी खऱ्या आहेत. साखर कारखान्यांच्या स्वत:च्या समस्या आहेत , परंतु पैसे उशिरा मिळाल्यास शेतकरी तोट्यात राहतात. त्यांनी कृषी कामगारांच्या अनुप–लब्धतेकडेही लक्ष वेधले आणि ऊस तोडणीचे श्रम कमी करण्यासाठी प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीसह यांत्रिकीकरणात नवसंशोधन करण्याचा सल्ला दिला. ''मी आयसीएआरला ऊस संशोधनासाठी एक स्वतंत्र पथक स्थापन करण्याची विनंती करतो, ज्यामध्ये व्यावहारिक मुद्द्यांवर लक्ष दिले जाईल. संशोधन शेतकरी आणि उद्योग दोघांसाठीही फायदेशीर असायला हवे. ज्या संशोधनाचा शेतकऱ्यांना उपयोग नाही ते संशोधन निरर्थक आहे,'' असे ते म्हणाले.

चर्चासत्रात आयसीएआरचे महासंचालक आणि डीएआरईचे सचिव डॉ. एम.एल. जाट यांनी निरीक्षण नोंदवले की उसासाठी जास्त प्रमाणात पाणी आणि खताची आवश्यकता असते. पाण्याच्या कमतरतेवर मात करण्यासाठी अनेक अभ्यास केले गेले आहेत आणि महाराष्ट्रात अवलंबण्यात येणाऱ्या सूक्ष्म सिंचन पद्धती आशादायक उपाय देतात. सध्या होत असलेला खतांचा वापर अकार्यक्षम आहे आणि खतांची कार्यक्षमता सुधारणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले .आयसीएआरमधील पीक विज्ञान उपमहासंचालक डॉ. देवेंद्र कुमार यादव यांनी आश्वासन दिले की शेतकऱ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी चर्चासत्रातील शिफारशींचा काळजीपूर्वक विचार केला जाईल.

## संपादकीय

# जीवघेणी लोकप्रियता

नेता–अभिनेता विजय याच्या प्रचारसभेमध्ये चेंगराचेंगरी होऊन अनेक निरपराध नागरिकांना प्राणास मुकावे लागण्याची दुर्घटना, हा अधिकाधिक गर्दी जमवून शक्तिप्रदर्शन करण्याचा राजकीय नेत्यांचा सोस, आपल्या आवडत्या अभिनेत्याला पाहण्यासाठी बेभान होणाऱ्या चाहत्यांचा अतिउत्साह, अपुरे नियोजन व गर्दी आवरण्यात सरकारी यंत्रणांचे अपयश अशा विविध स्तरांवरील बेजबाबदारपणाचा परिपाक आहे. तमिळनाडूतील करूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत ४० जणांचा मृत्यू झाला आणि पन्नासहून अधिक जण जखमी झाले. मृत्युमुखींमधील १६ महिलांचा आणि दहा बालकांचा समावेश अधिक सुन्न करणारा आहे. ही घटना जेवढी हृदयद्रावक आहे; त्याहून आता या घटनेबाबत सुरू झालेले आरोप–प्रत्यारोप आणि राजकारण संतापजनक आहे. नेते–अभिनेते, क्रिकेटपटूंचे असे इव्हेंट आणि धार्मिक कार्यक्रमांच्या स्थळीची अनावर गर्दी यामुळे यापूर्वीही अनेक दुर्घटना घडल्या आहेत; मात्र त्यातून काहीही बोध न घेता, कोणतीही उपाययोजना न करता पुन्हा त्याच उत्साहाने अशा कार्यक्रमांच्या आयोजनाचा सपाटा सुरूच आहे. या देशात माणसांच्या जीवाला किडामुंग्यांइतकीही किंमत राहिलेली नाही, हेच या बेफिकिरीतून दिसते.

अन्न, वस्त्र, निवारा यांप्रमाणेच चित्रपट हीसुद्धा मूलभूत गरज असावी, अशी स्थिती दक्षिणेकडील राज्यांत, विशेषत: तमिळनाडूत आहे. त्यामुळे लोकप्रियतेचे उच्चांक गाठून, त्या बळावर राजकारणातही प्रचंड यश मिळविलेल्या अभिनेत्यांचीही संख्या तेथे मोठी आहे. जोसेफ विजय याच परंपरेतला. एका चित्रपटासाठी दीडशे ते दोनशे कोटी रुपये आकारणाऱ्या या अभिनेत्याचे समाजमाध्यमांतही कोट्यवधी फॉलोअर आहेत. गेल्या वर्षी त्याने राजकारणात उडी घेतली आणि तमिळग वेत्री कळघम या पक्षाची (टीव्हीके) स्थापना केली. वेल्लीपुरममध्ये गेल्या वर्षी या पक्षाच्या पहिल्या मेळाव्यातही अशीच चेंगराचेंगरी होऊन सहा जणांचा बळी गेला होता. तेव्हापासून त्याच्या सभा–मेळाव्यांबाबत पोलिस अधिकच खबरदारीच्या सूचना देत होते; परंतु यांपैकी कोणत्याही उपाययोजनांचे पालन झालेले नसल्याचे करूर दुर्घटनेतून दिसते. या सभेला सुमारे बारा हजार नागरिक येतील, असा अंदाज वर्तवून पक्षाकडून परवानगी घेण्यात आली होती; प्रत्यक्षात तेथे ३० हजारांहून अधिक लोक जमले.

सभेचे मुख्य आकर्षण असलेला विजय सहा तास उशिरा आल्याने गर्दीत भर पडत गेली. चेंगराचेंगरी कशी झाली याच्या कारणांत, काही जण झाडाच्या फांद्यांवरून खाली कोसळल्याचा, वाहनातून फेकलेल्या पाण्याच्या बाटल्या घेण्यासाठी झुंबड उडाल्याचा समावेश आहे. काहीही असले, तरी प्रशासनयंत्रणाही अपुरी पडली अन् गर्दी नियंत्रणात राहिली नाही, गर्दीच्या व्यवस्थापनासाठी विजयच्या पक्षाकडे शिस्तबद्ध कार्यकर्त्यांची फळी नव्हती, हेच यामागील वास्तव. या दुर्घटनेनंतर पंतप्रधानांपासून ते स्वत: विजयनेही तीव्र दु:ख व्यक्त केले असून बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना आणि जखमींना आर्थिक मदतही जाहीर केली आहे; त्यामागील भावना प्रामाणिक असेलही, मात्र त्यातून गेलेले जीव परत येणार नाहीत. गर्दीमुळे नागरिकांना प्राणास मुकावे लागल्याच्या दुर्घटनांची मालिका सध्या दिसते. प्रयागराजमध्ये कुंभमेळ्यात चेंगराचेंगरी होऊन अनेकांचे बळी गेले होते. दिल्लीत मेट्रो स्टेशनवर हाच प्रकार घडला. बेंगळुरूमध्ये 'आयपीएल' विजेत्या संघाच्या स्वागतासाठी जमलेल्या गर्दीतही चाहत्यांचे बळी गेले. अभिनेता अल्लू अर्जुनच्या चित्रपटाच्या खेळासाठी जमलेली गर्दी जीवघेणी ठरली; त्याप्रमाणेच नवी मुंबईत 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार कार्यक्रमातही अशीच दुर्घटना घडली होती. तेव्हाच्या उन्हाळ्याने दुर्घटनेची तीव्रता वाढवली. विजयच्या सभेत चाहत्यांची गर्दी रोखणे अवघड झाले; पण अनेक नेते जगाला आपली शक्ती दाखवून देण्यासाठी प्रसंगी पैसे–जेवण–मद्य अशी आमिषे दाखवून गर्दी जमवत असल्याचेही अनेकदा उघडकीस आले आहे. त्यांच्या या सोसापायी करोनाकाळातही अलोट गर्दीच्या सभांचे आयोजन झाल्याचे देशाने पाहिले आहे.

# उत्सव नवदुर्गांचा - सन्मान स्त्री शक्तीचा जादू . . . सुप्रिया मडव यांच्या जादूई बोटांची !

स्वर्णभूमी न्यूज

महिला ही कुटुंबाची केंद्रबिंदू असून तिच्या शिक्षण, आरोग्य, स्वावलंबन आणि आत्मविश्वासा वरच संपूर्ण कुटुंब उभा राहते किंबहुना त्या कुटुंबाचे भवितव्य अवलंबून असते. म्हणूनच महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हे प्रगत समाजाचे लक्षण मानला हवे. राज्यातील महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक विविध योजना कार्यरत आहेत तसेच अनेक स्वंयसेवी संस्थाही कार्यरत आहेत. मात्र विविध योजनांची अथवा स्वयंसेवी संस्थाची मदत घेत असताना त्यामध्ये अचूक संधी शोधता येणे गरजेचे आहे. या संधीचा ज्या महिला भगिनी शोध घेतात अशाच महिला भगिनी आपआपल्या क्षेत्रात एक नवक्रांती घडवितात–अशीच एक नवक्रांती पर्यायाने अर्थक्रांती घडविणाऱ्या नवदुर्गेची ही नव कहानी ...

हातकणंगले तालुक्यातील कोरोची येथे राहणाऱ्या पूर्वाश्रमीच्या साधना मारुती वाईंगडे तर विवाह पश्चात सौ. सुप्रिया संतोष मडव त्यांचे लौकिक अर्थाने इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण झाले. घरची आर्थिक स्थिती बेताची त्यामुळे दैनंदिन कष्टाशिवाय पर्याय नव्हता. त्यांचे मिस्टर संतोष सदाशिव मडव यांनी इ. अ. पर्यंत शिक्षण घेऊ इचलकरंजी येथे दहा वर्ष पावरलूम(हातमाग) वर काम केले. विवाहनंतर आपण काहीतरी वेगळे करावे हा विचार सुप्रिया यांच्या मनात आला त्यानुसार त्यांनी तो पती संतोष यांना बोलून



दाखविला. परंतु घरची परिस्थिती सामान्य असल्यामुळे आर्थिक प्रश्न उपस्थित राहिला. अशा वेळेला त्यांच्या पाठीमागे मराठा समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी कार्यरत असलेले अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ भक्कमपणाने उभे राहिले. त्यांनी अण्णासाहेब पाटील महामंडळाकडे आर्थिक मदतीबाबतची फाईल दाखल केली. काटेकोर छाननी नंतर हुपरी येथील जनता सहकारी बँक लिमिटेड आजरा शाखेने त्यांना पंधरा लाख रुपयांचे कर्ज सात वर्षासाठी मंजूर केले. या कर्जातून त्यांनी स्वत:च्या राहत्या जागेत 'सोनल टेक्स्टाईल ' नावाचा साडी व शालू बनविण्याचा छोटेखानी उद्योग उभा केला.

रॅपीअर मशीन तसेच जकाट इलेक्ट्रॉनिक मशीनचे दोन युनीट ऑर्डर करून या सामग्रीतून पैठणी, जरीची, कांजीवरम,तानावार्फ साड्यांची तसेच शालूची निर्मिती करण्यास त्यांनी प्रारंभ केला. बेळगाव येथील डीव्हीएस (ऊत्रड) कंपनीचे बेंगलुरु येथे अद्यावत कार्यालय आहे. या कार्यालया मार्फत मडव दाम्पंत्याला कच्च्या मालाचा पुरवठा करण्यात येतो. दररोज मडव दाम्पंत्य ७ते ८साड्या बनवितात तसेच ऑर्डर नुसारही तयारही करतात. त्यांनी बनविलेल्या साड्या शालू हे जयपुर, सुरत, बेळगाव, मुंबई आणि बेंगलोर या ठिकाणी विक्रीसाठी जातात. या कामातून त्यांना प्रति महिना साधारणता ५५ ते ६० हजार रुपये मिळतात. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार प्रतिदिनी ६०० रुपये (प्रत्येकी) या प्रमाणे दैनंदिन मजुरीवर हे जोडपे काम करते.

घरातल्या घरात सुरु असलेला हा छोटेखानी उद्योग आम्ही लवकरच दोन गुंठ्यात स्थलांतरित (विस्तारित) करणार असल्याचे श्रीमती सुप्रिया मडव यांनी सांगितले. या आमच्या छोटेखानी उद्योगांमध्ये अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचा अत्यंत मोलाचा वाटा असल्याचे श्रीमती मडव हे नम्रपणाने कबूल करतात तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या मराठा समाजातील युवक – युवतींनी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्या करतात.

सुप्रिया मडव यांचे कार्यकर्तृत्व आणि समर्पण हे प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. शारदीय नवरात्र हा उत्सव केवळ भक्तीचा नाही, तर स्त्री शक्तीच्या सामर्थ्याचा आणि सर्जनशीलतेचा उत्सव आहे. श्रीमती सुप्रिया यांच्यासारख्या नवदुर्गा आपल्या कुटुंबाला तसेच समाजाला समृद्ध आणि सक्षम बनवत आहेत यात शंका नाही. त्यांच्या या अविरत परिश्रमाला,प्रयत्नांना मानाचा मुजरा.

फारूक बागवान
(माहिती अधिकारी)
९८८१४००४०५

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सवलतीच्या दरात पुस्तक विक्री

स्वर्णभूमी न्यूज

नागपूर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी मार्फत धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दिनांक २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजतापासून दीक्षाभूमी येथे सवलतीच्या दरात पुस्तक विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे.

दीक्षाभूमी येथे स्टॉल क्रमांक जी–२६१, २६२, २६३ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेली ग्रंथसंपदा तसेच बाबासाहेबांच्या विचारावर आधारित संवैधानिक मुल्यांचा जागर करणारे ग्रंथ विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत. अनुयायांना माफक सवलतीच्या दरात हे ग्रंथ उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सकाळी ९ वाजता सामाजिक न्यायभवन येथे 'भिमवादळ' या ढोल–ताशा पथकाच्या माध्यमातून बाबासाहेबांना मानवंदना देण्यात येणार आहे. पथकासह मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत सामाजिक न्याय भवन ते दीक्षाभूमी असे समता रॅली काढण्यात येणार असून, रॅलीनंतर मान्यवरांच्या उपस्थित दीक्षाभूमी येथील बार्टीच्या पुस्तक स्टॉलचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

यादिवशी सामाजिक न्याय भवनाच्या आवारातील बार्टीच्या स्टॉलवर बार्टीच्या विविध योजनांची माहीती देण्यात येणार आहे. या योजनांशी सबंधीत माहितीपत्रकाचे वाटप करण्यात येणार आहेत. सोबतच सविंधानाच्या प्रती आणि संविधानाच्या प्रास्ताविका उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

दुपारी सामाजिक न्याय भवन येथे प्रसिध्द गायक विष्णु शिंदे व विकास राजा यांच्या आंबेडकरी विचारांवर आधारित शाहिरी जलसाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सर्व कार्यक्रमास अधिकाधिक संख्येनी उपस्थित राहण्याचे आवाहन बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्फत करण्यात आलेले आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष : गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी आशेचा किरण

स्वर्णभूमी न्यूज

आपल्या समाजात अनेक कुटुंबे अशी आहेत, ज्यांना अचानक उद्भवलेल्या गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मोठे वैद्यकीय खर्च करावे लागतात. अशा वेळी आर्थिक अडचणींमुळे अनेकांना योग्य उपचार मिळविणे कठीण होते. याच गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू केला आहे. हा कक्ष खऱ्या अर्थाने अनेकांसाठी 'जीवनदायी' ठरत आहे, आणि यामागे एक सुव्यवस्थित यंत्रणा कार्यरत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा मुख्य उद्देश हा राज्यातील गरजू नागरिकांना दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. या निधीतून केवळ वैद्यकीय मदतच नाही, तर नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या नागरिकांनाही आर्थिक सहाय्य पुरविले जाते. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रयत्न केले जातात. मुख्यमंत्री सचिवालयाच्या दि.१३ ऑगस्ट २०१५ च्या परिपत्रक क्र. मुमंसनि–२०१५प्र.क्र.१निधी कक्ष नुसार गेल्या काही वर्षापासून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष कार्यरत असून, या कक्षाच्या माध्यमातून हजारो रुग्णांना उपचार मिळाले आहेत.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

आर्थिकदुर्बल रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविणे: राज्यातील गरीब व गरजू नागरिकांना महागड्या व जीवनावश्यक उपचारांसाठी आर्थिक सहाय्य देणे (जसे को कर्करोग, हृदयरोग, किडनी प्रत्यारोपण, इत्यादी).

धर्मादायरुग्णालयांमधील सुविधा वाढविणे: राज्यातील धर्मादाय रुग्णालयांना आवश्यक वैद्यकीय उपकरणे, औषधे किंवा सुविधा निर्माण करण्यासाठी सहाय्य करणे.

सरकारीआणि खासगी यंत्रणांमधील समन्वय: वैद्यकीय मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील सेवा एकत्रित करून नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा उद्देश.

आरोग्यसेवा उपलब्धतेत समता आणणे: गरीब, वंचित, आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांनाही उच्च दर्जाची आरोग्य सेवा मिळावी, यासाठी प्रयत्न करणे.

सामाजिकजबाबदारी अंतर्गत रुग्णालयांकडून मदत मिळविणे: धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्या उङ्ठ अथवा ढ्रींीं च्या माध्यमातून अधिकाधिक गरीब रुग्णांवर मोफत किंवा सवलतीने उपचार करावेत, यासाठी त्यांच्याशी समन्वय ठेवणे.

त्वरितनिर्णयप्रक्रिया व पारदर्शकता: रुग्णांच्या अर्जावर त्वरीत निर्णय घेणे व निधी वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे.

राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय समित्या

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या योग्य आणि पारदर्शक वितरणासाठी राज्य आणि जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्या निधीचा वापर योग्य गरजूंपर्यंत पोहोचतो की नाही याची खात्री करण्यासाठी नेमण्यात आल्या आहेत.

राज्यस्तरीय समिती (मंत्रालय स्तर)

राज्यस्तरीय समिती ही मुख्यमंत्री सहायता निधीच्या व्यवस्थापनाची आणि धोरणात्मक निर्णयांची शिखर संस्था आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या अखत्यारित हा कक्ष कार्य करतो.

प्रमुख कार्ये

- निधीच्या वितरणाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.
- मोठ्या आर्थिक मदतीसाठीच्या अर्जांचे पुनरावलोकन करणे.
- राज्यभरातील निधीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे.
- नवीन आजार किंवा उपचारांचा निधीसाठी समावेश करण्याबाबत विचार करणे.
- राज्यातील सर्व जिल्हास्तरीय कक्षांशी समन्वय साधणे.

राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष' सुरू करण्यात यावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते, त्यानुसार या कक्षाचे दि.१ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पालकमंत्री मंत्री राज्यमंत्री यांच्या हस्ते संपूर्ण राज्यात उद्घाटन करण्यात आले.

या कक्षाचे राज्यस्तरीय प्रमुख म्हणून रामेश्वर नाईक हे जबाबदारी सांभाळीत आहेत.

# गोकुळकडून दूध उत्पादकांना दिवाळी भेट; तब्बल १३६ कोटींचा मिळणार बोनस

स्वर्णभूमी न्यूज



कोल्हापूर – कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाकडून (गोकुळ) यंदा दूध उत्पादकांना दिवाळीपूर्वी मोठी आर्थिक भेट देण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये दुधाच्या अंतिम दर फरकाप्रमाणे तब्बल १३६ कोटी ०३ लाख रुपयांची रक्कम १ ऑक्टोबर रोजी थेट प्राथमिक दूध संस्थांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. ही रक्कम मागील वर्षाच्या तुलनेत २२ कोटी ३७ लाख रुपये जास्त असून, सुमारे ५ लाख शेतकरी दूध उत्पादकांना लाभ होणार असल्याचं गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केलं.

डिव्हिडंड ८ कोटी ३८ लाख इतका : गोकुळ संघानं म्हैस दुधासाठी सरासरी प्रति लिटर २ रुपये ४५ पैसे व गाईच्या दुधासाठी १ रुपये ४५ पैसे दर फरक घोषित केला असून या व्यतिरिक्त डिबेंचर, व्याज आणि शेअरवरील डिव्हिडंड यामुळं ही मोठी रक्कम तयार झाली आहे. यामध्ये म्हैस दूध उत्पादकांसाठी ६६ कोटी ३७ लाख तर गाय दुधासाठी ४५ कोटी १४ लाख रुपये प्रमाणे फरकांशिवाय ६ टक्के व्याज ५ कोटी ५२ लाख, डिबेंचर व्याज ७.८० टक्के प्रमाणे १० कोटी ६७ लाख तसंच शेअरवरील डिव्हिडंड ८ कोटी ३८ लाख इतका समावेश आहे.

सकारात्मक बदल घडविण्यासाठी गोकुळ कटिबद्ध : गोकुळकडून दूध उत्पादनात वाढ आणि दूध विक्रीमधील विक्रम मोडताना रोजच्या दूध संकलनाचा टप्पा १८ लाख ५९ हजार लिटर झाला असून दिवाळी सणानिमित्त एका दिवशी २३ लाख ६३ हजार लिटर दूध विक्री करण्यात आली आहे. हे आर्थिक लाभ म्हणजे शेतकऱ्यांच्या श्रम व विश्वासाची दखल असून दूध उत्पादकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी गोकुळ कटिबद्ध असल्याचा विश्वास चेअरमन नविद मुश्रीफ यांनी व्यक्त केला.

यावर्षी गोकुळनं ४२ कोटी रुपये पशुवैद्यकीय उपचार, कृत्रिम रेतन, वैरण विकास, दूध संस्था इमारती बांधणी, किसान विमा, वैयक्तिक वैद्यकीय सेवा आणि शिक्षणासह विविध सामाजिक व उत्पादन संबंधित योजनांवर खर्च केला आहे. गोकुळच्या या धोरणामुळं जिल्ह्यातील ६ हजाराहून अधिक दूध संस्थांना तसंच दूध उत्पादकांना दीर्घकालीन आर्थिक व सामाजिक मदत मिळत आहे.

दिवाळी आधी जमा होणार रक्कम : चेअरमन नविद मुश्रीफ यांनी सर्व प्राथमिक दूध संस्थांना दिपावलीच्या आधी ही रक्कम खात्यांत जमा करून दूध उत्पादकांच्या आनंदात भर घालण्याचं आवाहन केलं आहे. याशिवाय म्हैस दूध उत्पादन वाढीसाठी जातिवंत म्हैशी खरेदी अनुदान योजनेत दूध उत्पादकांनी भाग घ्यावा, असंही नवीन मुश्रीफ यांनी म्हटलं आहे.

दिवसाला २० लाख लिटर दूध संकलनाचा निर्धार : गोकुळ संघानं आपल्या वार्षिक उलाढालीत मोठी आर्थिक कामगिरी करत ३ हजार ९६६ कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. जिल्हा विकास आणि ग्रामस्थांच्या हितासाठी आता पुढील टप्पा २० लाख लिटर दिवसाला दूध संकलन करण्याचा आणखी एक मोठा प्रयत्न सुरू आहे. यासाठी शेतकरी, दूध संस्था आणि शासन यांच्यातचे सामंजस्य व सहकार्य आवश्यक असल्याचे नविद मुश्रीफ यांनी अधोरेखित केलं. दरम्यान, दरवर्षीप्रमाणं यंदाही गोकुळनं दूध उत्पादकांना आर्थिक बळकटी देण्यासाठी पूर्ण तयारी दाखविली आहे. त्यामुळं आनंदाचा आणि समृद्धीचा दिवाळी सण शेतकरी कुटुंबांसाठी अधिक गोड ठरणार आहे.

# महावितरणमधील ग्राहकसेवेच्या कार्यालयांच्या पुनर्रचनेला आजपासून प्रायोगिक तत्वावर प्रारंभ

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई– महावितरण अंतर्गत थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आली आहे. या पुनर्रचनेला प्रायोगिक तत्त्वावर बुधवारी (दि. १) प्रारंभ होत आहे. येत्या महिन्याभरात कामाकाजाचा आढावा घेऊन पुनर्रचनेचा मसूदा अंतिम करण्यात येईल व दि. १ नोव्हेंबरपासून ही पुनर्रचना लागू करण्यात येईल. दरम्यान, या पुनर्रचनेच्या अंमलबजावणीच्या कालावधीत वीजग्राहकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याचे सर्वाधिकार परिमंडलांच्या मुख्य अभियंत्यांना देण्यात आले आहेत.

महावितरण अंतर्गत १६ परिमंडलांमध्ये १४७ विभाग, ६५२ उपविभाग व ३२७४ शाखा कार्यालय तसेच ४,१८८ उपकेंद्रांमध्ये सुमारे ४४ हजार अभियंते व तांत्रिक कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये प्रामुख्याने उपविभाग व शाखा कार्यालयांद्वारे नवीन वीजजोडणी, मासिक वीजबिल, सुरळीत वीजपुरवठ्यासाठी वीज यंत्रणेची नियमित देखभाल, तांत्रिक बिघाडांची दुरुस्ती, वीजबिलांची थकबाकी वसूली, वीजहानी कमी करणे आदी कामे करण्यात येतात. त्यामुळे अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांना एकाच वेळी १० ते १२ प्रकारची कामे करावी लागत आहे. ही रचना सुमारे २५ वर्षांपूर्वीची आहे व त्यावेळच्या ग्राहकसंख्येनुसार करण्यात आली होती.

पूर्वीच्या रचनेचा परिणाम गेल्या काही वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर आणि ग्राहकसेवेवर देखील झालेला दिसून येत आहे. त्यामुळे सरसकट कामांचा ताण कमी करून निवडक कामांची जबाबदारी द्या अशी मागणी गेल्या १० वर्षांपासून अभियंता व कर्मचाऱ्यांच्या संघटनांद्वारे करण्यात येत होती.

व्यवस्थापनाने त्यासाठी विशेष समिती स्थापन करून कर्मचारी संघटनांशी वेळोवेळी चर्चा करून पुनर्रचनेचे प्रारूप तयार केले आहे.

प्रामुख्याने थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांच्या पुनर्रचनेवर भर देण्यात आला आहे. विशेष म्हणजे शहरी, ग्रामीण व दुर्गम भागातील ग्राहकसंख्या व भौगोलिक क्षेत्रानुसार संबंधित उपविभाग व शाखा कार्यालयांची फेररचना करण्यात आली आहे. सोबतच ग्राहकसंख्येनुसार अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात आणखी २ विभाग कार्यालय, ३७ उपविभाग आणि ३० शाखा कार्यालयांची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. या कार्यालयांमुळे ८७६ अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदसंख्या देखील वाढली आहे. तर सध्या अस्तित्वात असलेल्या पदसंख्येत कोणतीही कपात होणार नाही. कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाला व आरक्षणाला कोणताही धक्का बसणार नाही याची काळजी घेण्यात आल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच परिमंडल, मंडल कार्यालयांसह संलग्न इतर कोणत्याही विभागांचा या पुनर्रचनेत समावेश करण्यात आलेला नाही.

महावितरणच्या विभाग कार्यालयांमध्ये कोणताही बदल न करता त्यात विभागीय देखभाल व दुरुस्ती पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. या १० सदस्यीय पथकात अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. विभागातील सर्व उपकेंद्र व ३३ केव्ही वीजवाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीचे काम या पथकाकडे राहणार आहे. तसेच प्रत्येक विभागात सध्या अस्तित्वात सर्व उपविभागांचे महसूल व देयके तसेच देखभाल व दुरुस्ती अशी विभागणी करण्यात येईल. म्हणजे एका विभागात सध्या चार उपविभाग कार्यालय असल्यास पुनर्रचनेत देखभाल व दुरुस्ती तसेच महसूल व देयके असे प्रत्येकी दोन उपविभाग राहतील.

देखभाल व दुरुस्ती उपविभागातील अभियंते व तांत्रिक कर्मचारी वीजयंत्रणेची देखभाल व दुरूस्तीचे कामे, नवीन वीजयंत्रणा उभारणे, वीजपुरवठ्याच्या तक्रारींचे निवारण आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे कामे करतील. तर महसूल व देयके उपविभागातील अभियंते, कर्मचारी नवीन वीजजोडणी, अचूक बिलींग, बिलिंग तक्रारींचे निवारण, थकबाकी वसूली ही कामे करणार आहेत.

ग्राहकसेवेसाठी देखभाल व दुरुस्ती आणि महसूल व देयके अशी विभागणी करण्यात आल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामांमध्ये आणखी सुसूत्रता येणार आहे. त्यांच्यावरील कामांचा ताण कमी होणार असून ग्राहकांना अधिक तत्परतेने महावितरणची सेवा मिळणार आहे.

शहरी भागातील शाखा कार्यालयांमध्ये पुनर्रचनेत फेरबदल करण्यात आला आहे. तर ग्रामीण भागातील शाखा कार्यालयांच्या कार्यपद्धतीत अंशतः बदल करण्यात आला आहे.

या पुनर्रचनेमुळे महसूल व देयकांच्या ग्राहकसेवेसाठी तसेच सुरळीत वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र उपविभाग कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांना सरसकट सर्वच कामे एकाचवेळी करण्याऐवजी आता अधिक केंद्रीत (फोकस) पद्धतीने निश्चित केलेली निवडक कामे करता येईल. कामाचे नियमानुसार तास निश्चित होतील व कामाचा ताण देखील कमी होणार आहे. कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होणार आहे. पर्यायाने वीजग्राहकांना मिळणारी ग्राहकसेवा आणखी दर्जेदार होणार आहे.

# पोलिसांनी परवानगी देऊनही ओवेसी यांची सभा ऐनवेळी रद्द

स्वर्णभूमी न्यूज

अहिल्यानगर – 'एमआयएम' पक्षाचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांची आज, मंगळवारी सायंकाळी नगरमध्ये होणाऱ्या सभेस पोलिसांनी परवानगी दिल्यानंतरही सभा ऐनवेळी रद्द करण्यात आली. रद्द झालेल्या सभेवरून 'एमआयएम' व राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप झडले. विशेष म्हणजे एमआयएमचे प्रदेश महासचिव समीर साजिद यांनी पोलिसांनीच संरक्षेमुळे शहरातील वातावरण खराब होऊ शकते, असे सांगत सभा पुढे ढकलण्याची विनंती केल्याने, आम्ही सभा रद्द केल्याचा दावा केला आहे.

एमआयएमचे प्रमुख खासदार ओवेसी यांची शहरात पूर्वनियोजित सभा होती. दरम्यान काल, सोमवारी शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर ओवेसी यांची सभा होणार की नाही, याबद्दल आज सकाळपर्यंत संदिग्धता होती. नाशिक विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे हेही या पार्श्वभूमीवर रात्रीच नगरमध्ये दाखल झाले होते. त्यांच्यासह जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घाडगे यांनी रात्रीच सभास्थळाची पाहणी केली. अखेर आज, मंगळवारी सकाळी सभेस सशर्त परवानगी देण्यात आली.

सभा शांततेत पार पाडावी यासाठी तिथून चिथावणीखोर व इतर धर्मियांच्या भावना दुखावतील, अशा पद्धतीने वक्तव्य करू नये, धनिक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा पाळावी आदी स्वरूपाच्या अटी घालण्यात आल्या होत्या तसेच एमआयएमच्या कार्यकर्त्यांसह विरुद्ध बाजूनेही एकूण सुमारे १०० हून जणांना अधिक जणांना पोलिसांनी नोटीस बजावल्या होत्या.

त्यानुसार सभेची तयारीही सुरू करण्यात आली. मुकुंदनगर भागात व्यासपीठ उभाण्यात आले. प्रेक्षकांसाठी खुर्चाही टाकण्यात आल्या. पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला. सभा सायंकाळी ७ वा. होती. तत्पूर्वी खासदार ओवेसी दुपारी ३ वा. नगरमध्ये येऊन वक्फ बोर्डाच्या प्रश्न संदर्भात उलेमांची बैठक घेणार होते. पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अश्रफी व माजी नगरसेवक समद खान हेही ओवेसी यांचा दौरा, सभा होणारच असे सांगत होते. मात्र, अचानक दुपारी २.३० च्या सुमारास सभा रद्द करण्यात आल्याचा निरोप मिळाला. सभा पुन्हा होईल

# सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत स्वमालकीची जागा असल्याची सनद मिळाल्याने पट्टेधारकांच्या डोळ्यात आनंदाश्रू

स्वर्णभूमी न्यूज



नागपूर – ज्या भागात पाणंद रस्त्यांना पर्याय म्हणून भक्कम मोठे रस्ते उपलब्ध झाले अशा जुन्या पाणंद रस्त्याच्या बाजुला अनेक वर्षापासून आश्रय घेतलेल्या गोरगरिब कुटुंबांना आपल्या मालकीचा निवारा मिळावा अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. यातूनच आपण पट्टे वाटप मोहिमेला गती दिली. हुडकेश्वर येथील जुन्या पाणंद रस्त्यावरील गत अनेक वर्षापासून आश्रयास असलेल्या ५९ नागरिकांसह एकूण १०४ नागरिकांना त्यांच्या मालकीची सनद देतांना मनस्वी आनंद व समाधान असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा अंतर्गत हुडकेश्वर येथील इंगोले नगर येथे त्यांच्या हस्ते पट्टे वाटप करण्यात आले. काल दिनांक २९ सप्टेंबर रोजी झालेल्या या समारंभास उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक सतीश पवार, तहसीलदार कल्याणकुमार दहाट तसेच अन्य मान्यवर, अधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणंद रस्त्यावरील त्या ५९ नागरिकांना आपल्या मालकीची आता सनद अर्थात जागेचा पट्टा मिळाल्याने एक नवी उभारी या कुटुंबांनी घेतली. शासनाच्या या निर्णयाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करुन पट्टे वाटप योजनेची उपयोगीता अधोरेखित केली. पाणंद रस्त्यावरील अतिक्रमीत घरांना कायदेशीर करून पट्टे वाटप करण्याचा राज्यातील हा पहिलाच उपक्रम असून, हा प्रयोग समाजातील सर्वसामान्यांना न्याय देणारा आणि खऱ्या अर्थाने लोकाभिमुख शासनाचा एक मापदंड म्हणून आता नोंदविला गेला आहे.

सेवा, स्वामित्व आणि सबलीकरणाचा संगम पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त (१७ सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवडा उपक्रमात हा कार्यक्रम नागरिकांपर्यंत सरकारच्या सेवाभावाची साक्ष देणारा ठरला. नागरिकांच्या दीर्घ प्रतीक्षेला पूर्णविराम देत पाणंद रस्त्यावरील अतिक्रमणधारक ५९ कुटुंबांना अखेर त्यांच्या घराचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला, हुडकेश्वर येथील पाणंद, सर्व्हे नं. १७३ व १७४ येथे ५९ पट्टे, हुडकेश्वर गावठाण शेजारील सर्व्हे नं. १ येथे ४५ पट्टे असे एकूण १०४ नागरिकांना त्यांच्या मालकीच्या सनद प्रदान करण्यात आल्या. हातात सनद/पट्टा मिळताच अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले.

# 'छावा'मधल्या औरंगजेबानंतर अक्षय खन्ना 'असुरगुरु शुक्राचार्य'च्या रूपात

स्वर्णभूमी न्यूज



मुंबई – २०२५ वर्षातला सर्वात पहिला हिट बॉलिवूड मूव्ही कोणता? असं विचारलं तर प्रत्येकाच्याच ओठी सर्वात आधी नाव येतं ते 'छावा'. या सिनेमात प्रत्येकाच्याच भूमिकेचं कौतुक झालं, पण त्यातल्या त्यात लक्ष वेधून घेणारी भूमिका ठरली ती, अक्षय खन्नानं साकारलेल्या औरंगजेबाची. त्याची चालण्याची पद्धत, बोलण्याची ढाप, ती करडी नजर प्रेक्षकांना थेट औरंगजेबाची आठवण करुन देणारी ठरली. अशातच आता 'छावा' सिनेमातल्या धमाकेदार भूमिकेनंतर आता अक्षय खन्ना नव्या भूमिकेत दिसणार आहे. या नव्या सिनेमातला अक्षय खन्नाचा लूकही रिलीज करण्यात आला आहे.

गाजलेल्या 'हनुमान' सिनेमाचे दिग्दर्शक प्रशांत वर्मा पुन्हा एकदा त्यांच्या नव्या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर लोकांची मनं जिंकण्यासाठी सज्ज झाले आहेत. काल, प्रशांत वर्मा यांच्या टीमनं घोषणा केलेली की, ते काहीतरी नवीन घेऊन येत आहेत. आज, प्रशांत वर्मा यांनी त्यांचा आगामी चित्रपट, महाकालीची घोषणा केली आणि चित्रपटातील अक्षय खन्नाचा पहिला लूक देखील रिलीज केला.

अक्षय खन्नाचा 'असुरगुरु शुक्राचार्य' या चित्रपटाचा पहिला लूक महाकाली चित्रपटातून प्रदर्शित – प्रशांत वर्मा यांनी आज त्यांचा नवा चित्रपट, महाकालीमध्ये असुरगुरु शुक्राचार्य म्हणून अक्षय खन्नाचा पहिला लूक प्रदर्शित केला आहे. जो भारतीय संस्कृतीतील सर्वात शक्तिशाली शक्तींपैकी एकावर आधारित आहे. चित्रपटाचं नाव 'महाकाली' असं आहे. प्रशांत वर्मा यांनी चित्रपटातील अक्षय खन्नाचा पहिला लूक प्रदर्शित केला. अक्षय खन्नानं चित्रपटात गुरू शुक्राचार्यांची भूमिका साकारली आहे. शुक्राचार्यांच्या भूमिकेत त्यांना ओळखणं कठीण आहे. पांढऱ्या पोशाखात लांब, पांढरे केस आणि कपाळावर टिळा लावल्याचं दिसतंय. अक्षय खन्नाचा लूक खरोखरच अद्भुत करणारा आहे.

प्रशांत वर्मा यांनी आपल्या आगामी सिनेमा 'महाकाली'तील असुरगुरू शुक्राचार्य यांच्या भूमिकेतला अक्षय खन्नाचा लूक रिलीज केला आहे. लूक शेअर करताना कॅप्शन देण्यात आलंय की, ''देवांच्या सावलीत, क्षमहाकालीतून शाश्वत 'असुरगुरु शुक्राचार्य'च्या रूपात बंडाची सर्वात तीव्र ज्वाला उठली''

दरम्यान, प्रशांत वर्मा यांनी आजच 'महाकाली' चित्रपटातील असुरगुरु शुक्राचार्य म्हणून अक्षय खन्नाचा पहिला लूक प्रदर्शित केला आहे. चित्रपटातील इतर कलाकारांबद्दल किंवा चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेबद्दल कोणतीही माहिती देण्यात आ–लेली नाही.

# 'स्टुडंट ऑफ द इयर' फेम अभिनेत्याच्या बॅगेत ३५ कोटींचे कोकेन; एअरपोर्टवरच ठोकल्या बेड्या

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई – बॉलीवूड आणि ड्रग्स हे कनेक्शन अनेक वेळा समोर आले आहे. नुकतच 'स्टुडन्ट ऑफ द इयर' या चित्रपटात काम केलेल्या एका सहकलाकाराला चेन्नई एअरपोर्टवर ड्रग तस्करी प्रकरणी अटक करण्यात आली. या अभिनेत्याकडून पोलिसांनी ३.५ किलो कोकेन जप्त केले आहे. या ड्रग्स ची किंमत अंदाजे ३५ कोटी असल्याची प्राथमिक माहिती आहे. नुकताच सिंगापूर मधून परत येत होता तेव्हा त्याला कस्टम आणि महसूल गुप्तचर संचालनालयाच्या संयुक्त पथकाने रोखले. त्याच्या ट्रॉली बॅगच्या एका सीक्रेट डब्यात कोकेन लपवल्याचे आढळले.

या अभिनेत्याचे नाव अजून उघड झालेले नाही. बॉलीवूडमधील चित्रपटांमध्ये लह–ानसहान भूमिका करणाऱ्या या सहकलाकाराला विमानतळावर थांबवण्यात आलं .त्याची तपासणी करण्यात आली



त्यावेळी ३.५ किलोच्या अंमली पदार्थासह त्याला पकडण्यात आले.

विशेष गुप्त माहितीच्या आधारे कस्टम्सच्या एअर इंटेलिजन्स युनिटने या अभिनेत्याला रविवारी पहाटे सिंगापूरहून चेन्नईत दाखल होताच थांबवले. तपासणीदरम्यान त्याच्या ट्रॉली बॅगच्या खालच्या गुप्त कप्प्यात प्लास्टिक पिशव्यांत पांढऱ्या रंगाचे पावडरसदृश्य पदार्थ आढळले. प्राथमिक चाचणीत ते कोकेन असल्याचे स्पष्ट झाले. अधिकाऱ्यांनी अभिनेत्याला ताब्यात घेऊन चौकशी सुरु केली असता तो कंबोडियाहून सिंगापूरमार्गे चेन्नईला आला असल्याचे उघड झाले. त्याने सांगितले की, कंबोडियामध्ये काही अनोळखी लोकांनी त्याला ही ट्रॉली दिली होती व ती चेन्नई विमानतळावर एका व्यक्तीकडे सुपूर्द करायची होती. मात्र, तपास यंत्रणांना शंका आहे की, हे कोकेन मुंबई किंवा दिल्लीतील आंतरराष्ट्रीय ड्रग्ज कार्टेलकडे पोहोचवण्याचा त्याचा हेतू होता. ींद या संपूर्ण जाळ्याचा शोध घेत असून कस्टम्स विभाग त्याच्या प्रवासाच्या नोंदींची चौकशी करत आहे, जेणेकरून याआधीही त्याने अशा प्रकारे अंमली पदार्थांची तस्करी केली आहे का याचा उलगडा होऊ शकेल.

दरम्यान, मागील दोन आठवड्यांत चेन्नई विमानतळावर कोकेनची ही दुसरी मोठी पकड आहे. १६ सप्टेंबर रोजी इथिओपियाहून आलेल्या केनियाच्या नागरिकाकडून २ किलो कोकेन जप्त करण्यात आले होते. तर १ सप्टेंबर रोजी चेन्नई कस्टम्सने ५.६ किलो कोकेन फेरेरो रोशेर चॉकलेटच्या डब्यांत लपवून आणणाऱ्या दोन प्रवाशांना अटक केली होती.

# कतरिना कैफने दिराचा वाढदिवस केला साजरा, गरोदरपणाच्या घोषणेनंतर अभिनेत्रीची पहिली झलक...

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई – बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ आणि विकी कौशल यांनी अलीकडेच त्यांच्या चाहत्यांना एक गोड बातमी दिली होती. गरोदरपणाची घोषणा केल्यानंतर हे जोडपे खूप चर्चेत आले आहेत. चाहते कतरिनाच्या गरोदरपणाबद्दल वारंवार अंदाज लावत होते आणि अखेर या स्टार जोडप्यानं त्यांच्या चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली. आता, विकी आणि कतरिना लवकरच त्यांच्या पहिल्या मुलाचे पालक बनण्याची तयारी करत आहेत. दरम्यान कतरिना कैफ तिच्या गरोदरपणाची घोषणा झाल्यानंतर पहिल्यांदाच दिसली आहे. कतरिनानं तिचा दिर सनी कौशलचा वाढदिवस साजरा केला. आता या सेलिब्रेशनमधील कतरिना कैफचा फोटो समोर आला आहे.

कतरिना कैफची पहिली झलक : अभिनेता सनी कौशलनं २८ सप्टेंबर रोजी त्याचा ३६वा वाढदिवस साजरा केला. या वाढदिवसाच्या पार्टीत त्याचे जवळचे मित्रही उपस्थित होते. मिनी माथुरनं आता सनी कौशलच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनचा एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये कतरिना कैफ असल्याची दिसत आहे. फोटोमध्ये आई होणारी कतरिना कैफच्या चेहऱ्यावर





स्मित हास्य आहे. शेअर केलेल्या फोटोमध्ये मिनी आणि कतरिना कैफची बहीण इसाबेल दिसत आहेत. या फोटोमध्ये कतरिनानं लाल रंगाचा ड्रेस परिधान केला आहे. तसेच फोटोमध्ये अभिनेत्रीच्या चेहऱ्यावर गरोद–रपणाचा आनंद असल्याचाही दिसत आहे.

दिर सनी कौशलच्या वाढदिवसानिमित्त कतरिना कैफ (दिर सनी कौशलच्या वाढदिवसानिमित्त कतरिना कैफ (मिनी माथुर आयजी स्टोरी))

कतरिना कैफ आणि विकी कौशलची गरोदरपणाची घोषणा : गेल्या आठवड्यातच कतरिना कैफ आणि विकी कौशल यांनी एका संयुक्त इंस्टाग्राम पोस्टद्वारे गरोद–रपणाची घोषणा केली. शेअर केलेल्या फोटोमध्ये कतरिना कैफचा बेबी बंपला विकी कौशल प्रेमानं स्पर्श करत होता. या पोस्टवर चाहते आणि सेलिब्रिटींनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

या जोडप्यानं गरोदरपणाची घोषणा करताना आपल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, 'आम्ही आनंद आणि कृतज्ञतेनं भरलेल्या हृदयांसह आमच्या आयुष्यातील सर्वोत्तम अध्याय सुरू करण्याच्या मार्गावर आहोत.' लग्नाच्या चार वर्षानंतर हे जोडपं त्यांच्या पहिल्या मुलाची अपेक्षा करत आहे. ९ डिसेंबर २०२१ रोजी राजस्थानमध्ये या जोडप्याचं भव्य लग्न झालं होतं.

# सुशांत सिंह राजपूत प्रकरणात रिया चक्रवर्तीला मोठा दिलासा

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई उच्च न्यायालयाकडून रिया चक्रवर्तीला मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) ला अभिनेत्रीचा पासपोर्ट परत करण्याचे निर्देश दिले आहेत. अभिनेता सुशांत सिंग राजपूतच्या मृत्यूनंतर २०२० मध्ये ड्रग्ज प्रकरणात अटक झालेल्या रियासाठी न्यायालयाचा हा निर्णय मोठा दिलासा आहे आणि पुढील महिन्यात तिला जामीन मंजूर करण्यात आला होता, या अटीवर की तिने तिचा पासपोर्ट एनसीबीकडे सोपवावा.

वकील अयाज खान यांच्यामार्फत दाखल केलेल्या तिच्या नवीन अर्जात तिने असा युक्तिवाद केला की, या आजारामुळे तिला कामात विलंब होत होता आणि अनेक प्रकल्पांना मुकावे लागत होते. खानने सांगितले की, रियाने सर्व जामीन अटींचे पालन केले आहे आणि कधीही न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केले नाही. तिने यावर भर दिला की तिच्या व्यवसायामुळे तिला शूटिंग, ऑडिशन आणि बैठकांसाठी वारंवार परदेशात जावे लागते.

एनसीबीने वकील एस के हलवासिया यांच्यामार्फत या याचिकेला विरोध केला आणि असा युक्तिवाद केला की सेलिब्रिटी असल्याने त्यांना विशेष वागणूक दिली जाऊ नये आणि त्यांच्या फरार होण्याचा धोका असल्याचा इशारा दिला.

तथापि, न्यायमूर्ती नीला गोखले यांनी सांगितले की, या प्रकरणातील इतर आर–ोपींनाही अशाच प्रकारची सूट देण्यात आली आहे आणि चक्रवर्ती यांनी खटल्यात सहकार्य केले, प्रत्येक परदेश दौऱ्यानंतर परतले आणि कधीही जामिनाच्या अटींचे उल्लंघन केले नाही.खटल्याच्या समाप्तीपर्यंत तिच्या उपलब्धतेवर ''शंका करण्याचे कोणतेही कारण नाही'' असे न्यायालयाने म्हटले. तिची याचिका स्वीकारत, खंडपीठाने निर्देश दिले की चक्रवर्ती यांना कनिष्ठ न्यायालयाने सूट दिल्याशिवाय सर्व सुनावणीच्या तारखांना हजर राहावे लागेल. परदेशात जाण्यापूर्वी, त्यांनी अभियोजन संस्थेला त्यांचे संपूर्ण प्रवास तपशील, हॉटेल आणि विमानाचे तपशील किमान चार दिवस आधी द्यावेत, त्यांचा संपर्क क्रमांक शेअर करावा, त्यांचा फोन चालू ठेवावा आणि परतल्यावर अधिकाऱ्यांना कळवावे.अलीकडेच, एनडीटीव्हीशी बोलताना, रियाने सुशांत सिंग राजपूत प्रकरणाबद्दल म्हटले होते की, ''लोक म्हणाले की तो तुमच्यामुळे गेला नाही. मला नेहमीच माहित होते की मी काहीही केले नाही. पण जेव्हा मला क्लीन चिट मिळाली, तेव्हाही मी आनंदी नव्हते. मी फक्त माझ्या पालकांसाठी आणि त्यांच्या आदरासाठी आनंदी होते. पण, आम्ही पू–र्वीसारखे निश्चिंत कुटुंब नाही; तो परत येऊ शकत नाही. त्या क्षणाने आम्हा सर्वांना, आमच्या संपूर्ण आयुष्यासाठी पूर्णपणे बदलले.''रिया पुढे म्हणाली, ''तुम्हाला सगळं कळतं, तुमच्याकडे काय आहे, जेव्हा तुम्हाला वाटायचं की तुमच्याकडे काहीच नाही. कारण तिथे तुम्हाला काहीही मिळत नाही. तुम्ही तुमच्या पालकांना गृहीत धरू शकत नाही, कारण ते तुम्हाला विचारत राहतात की तुम्ही खाल्ले आहे का.

# काजोलच्या म्हणण्यावर हसल्या जया बच्चन



स्वर्णभूमी न्यूज

गेल्या काही काळापासून, सपा खासदार आणि अभिनेत्री जया बच्चन पापाराझींसमोर थोड्या वेगळ्याच लूकमध्ये दिसत आहेत. अनेकदा त्यांच्या उद्रेकांमुळे बातम्यांमध्ये असलेल्या जया आता त्यांच्या हास्यामुळे चर्चेत आहेत. खरं तर, अष्टमीच्या निमित्ताने त्यांना उत्तर मुंबईतील सर्बोजनीन दुर्गा पूजा पंडालमध्ये पाहिले गेले होते. बंगाली समुदाय आणि मुखर्जी कुटुंबाने आयोजित केलेल्या दुर्गा पूजा पंडालमध्ये जया यांचे काजोलशी खास नाते स्पष्ट दिसून आले. दोघांचा हा व्हिडिओ आता व्हायरल होत आहे.

व्हिडिओमध्ये जया आणि काजोल पाप–ाराझींसाठी पोज देताना दिसत आहेत. काजोलची चुलत बहीण, शर्बानी मुखर्जी देखील तिथे दिसत आहे. आवाज ऐकून, जया प्रथम पापाराझींना शांतपणे बोलण्याचा इशारा करता. नंतर काजोल त्यांना काहीतरी समजावून सांगते आणि नंतर कॅमेऱ्यापासून दूर जाते.

काही अंतरावर उभी असलेली काजोल हसते आणि जयाला हसण्यासाठी हातवारे करते. पापाराझी देखील जयाला प्रोत्साहन देतात. काजोल आणि पापाराझी दोघांच्याही विनंतीवरून ती हसायला लागते.

जया यांच्या व्हिडिओवर इंटरनेट वापरकर्ते मजेदार कमेंट्स पोस्ट करत आहेत. त्यांना विश्वास बसत नाही की ती इतकी जोरात हसू शकते. एका वापरकर्त्याने लिहिले, ''मी तिला पहिल्यांदाच हसताना पाहिले.'' दुसऱ्याने लिहिले, ''जयाला हसवल्याबद्दल काजोलला ऑस्कर मिळाला पाहिजे.'' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, ''फक्त काजोल अशक्य ते शक्य करू शकते.''

तिने यापूर्वी तिचे डिझायनर मित्र अबू जानी आणि संदीप खोसला यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात पापाराझींसाठी पोज दिली होती. कार्यक्रमस्थळी जेव्हा तिला पा–पाराझी भेटले तेव्हा रागावण्याऐवजी तिने हसून पोज दिली.जया हसून म्हणाली होती, ''बघ मी किती हसतेय? तुम्ही सगळे इतके छान बसला आहात. नाहीतर तुम्ही सतत पळत असता. काय हरकत आहे? जेव्हा गोष्टी व्यवस्थित असतात तेव्हा मी फोटो द्यायला तयार असते. पण जेव्हा ते वैयक्तिक असते आणि तुम्ही लोक गुप्तपणे फोटो काढता तेव्हा मला ते आवडत नाही.''

# 'पंतप्रधानांनी दिलेला २५ लाखांचा चेक बाऊन्स', पाकिस्तानच्या खेळाडूनेच सांगितल लाजिरवाणे सत्य

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई – आशिया कपची स्पर्धा यावेळी सामन्यांपेक्षा त्याच्याभोवतीच्या वादांमुळेच जास्त गाजली. भारत आणि पाकिस्तानध्ये झालेल्या तिन्ही सामन्यांमध्ये नवनवे वाद निर्माण झाले. पाकिस्तानी खेळाडूंनी केलेले इशारे, भारतीय खेळाडूंनी हस्तांदोलन करण्यास दिलेला नकार यामुळे वाद निर्माण झाला.



दरम्यान भारताने फायनल जिंकल्यानंतर मोहसिन नक्की यांच्या हस्ते ट्रॉफी स्विकारण्यास नकार दिल्यानंतर पेटलेला वाद अद्याप शमलेला नाही. दुसरीकडे मोहसिन नक्की, जे पीसीबीचे प्रमुख आणि पाकिस्तानचे गृहमंत्री देखील आहेत, त्यांनी ट्रॉफी भारताला दिलेली नसल्याने बीसीसीयआने तक्रार दाखल केली आहे. यादरम्यान पाकिस्तानची आशिया कपसंदर्भात लाज काढणारी एक घटना समोर आली आहे. पाकिस्तानच्याच खेळडूने हा प्रकार उघड केला आहे.आशिया कप जिंकल्यानंतर बीसीसीआयकडून भारतीय संघाच्या खेळाडूंना २१ कोटींचं बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. यादरम्यान पाकिस्तानमधील एका जुन्या कटू आठवणींना उजाळा देणाऱ्या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. २०२३ रोजी युट्यूबर नादिर अलीसोबतच्या पॉडकास्टमध्ये पाकिस्तानचा माजी खेळाडू सईद अजमलने याचा खुलासा केला होता अजमलने त्या क्षणाची आठवण सांगितली होती, जेव्हा तत्कालीन पंतप्रधान युसूफ रझा गिलानी यांनी पाकिस्तानच्या विजयी संघाला चांगलं बक्षीस म्हणून पैसे देण्याची आश्वासन दिले होते.

व्हिडीओ नव्याने व्हायरल

हा व्हिडीओ नव्याने व्हायरल झाला असून, यामध्ये सईद अजमल खुलासा करत आहे की, पाकिस्तानच्या २००९ टी-२० वर्ल्डकप विजेत्या संघाला पंतप्रधानांनी २५ लाखांचा चेक दिला होता. पण हा चेक नंतर बाऊन्स झाला.

२५ लाखांचा सरकारी चेक बाऊन्स

प्रत्येक खेळाडूला २५ लाखांचा चेक मिळणार होता, जो त्यांच्या ऐतिहासिक टी-२० विश्वचषक विजयाबद्दल एक आनंददायी क्षण होता. पण अभिमानास्पद वाटणारा हा क्षण मात्र नंतर संपूर्ण देशासाठी लाजिरवाणा बनला होता.

...फक्त आयसीसीकडून बक्षीस रक्कम मिळाली

''आम्हाला चेक देण्यात आले होते, पण ते बाउन्स झाले,'' असे अजमलने सांगितले होते. ''सरकारी चेकही बाउन्स होऊ शकतो हे पाहून मला धक्का बसला. त्यांनी आम्हाला सांगितले की पीसीबी अध्यक्ष ते हाताळतील. पण पीसीबी अध्यक्षांनी हे आमचे नसून, सरकारने दिलेलं वचन आहे असे म्हटले. शेवटी, आम्हाला फक्त आयसीसीकडून बक्षीस रक्कम मिळाली,'' असा लाजिरवाणा खुलासा त्याने केला होता.

२०२५ च्या आशिया कपच्या अंतिम सामन्यात दुबईत भारताने पाकिस्तानवर मिळवलेल्या दमदार विजयानंतर काही तासांतच हा व्हिडिओ पुन्हा व्हायरल झाला. या व्हिडीओच्या माध्यमातून क्रिकेटप्रेमी दोन्ही देश केवळ मैदानावरच नव्हे तर ते त्यांच्या खेळाडूंशी कसे वागतात याची तुलना सुरू झाली. २००९ च्या पाकिस्तानच्या जेतेपदाच्या शर्यतीत १२ विकेट्स घेणाऱ्या आणि नंतर नंबर १ वनडे गोलंदाज म्हणून स्थान मिळवणाऱ्या अजमलने खुलासा केला की त्याला त्याच्या वैयक्तिक कामगिरीसाठी कधीही आर्थिक मदत मिळाली नाही. ''२०१२ आणि २०१३ मध्ये आयसीसी टीम ऑफ द इयरमध्ये माझे नाव होते. पण कोणतेही बक्षीस नव्हते, पैसे नव्हते. आयसीसी तुम्हाला त्यासाठी पैसे देत नाही, ते फक्त तुमचे नाव यादीत टाकतात,'' असे तो म्हणाला.

# लग्नाच्या दुसऱ्याच महिन्यात रंगेहाथ पकडले; युझवेंद्रबाबत धनश्री वर्माचे खळबळजनक विधान

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई – भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू युझवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा मार्च २०२५ रोजी घटस्फोट झाला. दरम्यान, सध्या 'राईज अँड फॉल' या रिॲलिटी शोमध्ये धनश्री वर्मा सहभागी झाली आहे. या शोमध्ये धनश्री युझवेंद्रसोबतच्या घटस्फोटाबाबत अनेक खुलासे करत आहे. आता धनश्रीने नवीन खळबळजनक दावा केला आहे. लग्न झाल्यानंतर दुसऱ्याचे महिन्यात युझवेंद्र चहलला रंगेहाथ पकडला होता, असे विधान धनश्री वर्माने केले. धनश्री वर्माच्या या विधानाची सध्या सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे.

युझवेंद्र चहल आणि धनश्री वर्माने मार्च २०२५ मध्ये कायदेशीर घटस्फोट घेऊन आपले नाते संपवले. अशातच ज्यावेळी दोघांच्या घटस्फोटाच्या चर्चानी जोर धरलेला, त्यावेळी धनश्रीने युजवेंद्र चहलकडे ६० कोटी रुपयांची पोटगी मागितल्याच्या चर्चाना उधाण आलेले. जे धनश्रीच्या कुटुंबानं अधिकृतपणे नाकारले.



पण नेमके सत्य काय? याचा खुलासा आता स्वत: धनश्रीनं केला आहे. धनश्री सध्या 'राईज अँड फॉल' या रिॲलिटी शोमध्ये दिसतेय. अलिकडच्याच एका भागात तिनं तिच्या घटस्फोटाबद्दल बोलताना म्हटले की, ६० कोटी रुपयांची पोटगी मागितल्याच्या सर्व चर्चा निराधार असल्याचे म्हटले आहे.

कोण आहे धनश्री वर्मा?

धनश्री वर्मा एक यूट्यूबर आहे. ती डान्सर, कोरिओग्राफर आणि एक सोशल मीडिया एन्फ्लूएंझरही आहे. यूट्यूबवर तिच्या डान्स व्हिडीओंनी लाखो व्ह्यूज मिळतात. तिचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात फॉलोअर्स आहेत. धनश्री अनेकदा लोकप्रिय बॉलिवूड गाण्यांचे नृत्यदिग्दर्शन करत व्हिडीओ पोस्ट करत असते.

धनश्री वर्माची एकूण संपत्ती २५ कोटी रुपये असल्याचे म्हटले जाते. वेगवेगळ्या ब्रँड्सच्या जाहिराती करते. याच जाहिराती करण्याचे ती कोट्यवधी रुपये घेते. विशेष म्हणजे ती लवकरच एका दाक्षिणात्त्य चित्रपटात झळकणार आहे. दुसरीकडे युझवेंद्र चहलची संपत्ती ४५ कोटी रुपये असल्याचे म्हटले जाते. आयपीएल २०२५ साठी युझवेंद्र चहलसाठी १८ कोटी रुपयांची बोली लागलेली आहे. त्याच्याकडे महागड्या गाड्या, आलिशान घर आहे. तोदेखील वे-गवेगळ्या ब्रँड्सच्या जाहिराती करतो.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेदरम्यान भारतीय क्रिकेट संघाचा फिरकीपटू युझवेंद्र चहल आणि आरजे महावश दुबई क्रिकेट मैदानावर अंतिम सामना पाहण्यासाठी उपस्थित होते. युझवेंद्र चहल आणि आरजे महावशला एकत्र पाहिल्यानंतर दोघंही एकमेकांना डेट करत असल्याची चर्चा सध्या सोशल मीडियावर रंगली होती.

# आशिया कप ट्रॉफी वादावर बीसीसीआय आक्रमक! विजेत्या संघाला ट्रॉफी का दिली नाही?



स्वर्णभूमी न्यूज

दुबई – आशिया कप २०२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानला हरवून विजेतेपद पटकावले असले तरी, पारितोषिक वितरण समारंभातील नाट्यमय घडामोडींमुळे ट्रॉफीचा वाद चांगलाच चिघळला आहे. भारतीय संघाने एशियन क्रिकेट काऊन्सिलचे अध्यक्ष आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसीन नक्की यांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारण्यास स्पष्टपणे नकार दिल्यानंतर नक्की हे ट्रॉफी घेऊन मैदानातून निघून गेले होते.

या संपूर्ण प्रकरणावर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आक्रमक झाले असून, मंगळवारी दुबईत झालेल्या एसीसीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बीसीसीआयच्या प्रतिनिधींनी हा मुद्दा जोरदारपणे उचलून धरला.

राजीव शुक्लांचा नक्की यांना थेट सवाल

बीसीसीआयचे प्रतिनिधित्व करत असलेले उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी या बैठकीत मोहसीन नक्की यांना थेट प्रश्न विचारला. ''विजेत्या संघाला ट्रॉफी का सोपवण्यात आली नाही? ही एसीसीची ट्रॉफी आहे, कोणाची वैयक्तिक मालमत्ता नाही. ती औपचारिक पद्धतीने विजेत्या संघाला दिली जावी लागते,'' असे शुक्ला यांनी स्पष्टपणे सांगितले.

मोहसीन नक्कींचे स्पष्टीकरण

यावेळी मोहसीन नक्की यांनी बाजू मांडताना सांगितले की, ''मी तेथे एका कार्टूनसारखा उभा होतो. भारतीय संघ माझ्याकडून ट्रॉफी स्वीकारणार नाही, अशी कोणतीही लेखी सूचना एसीसीला देण्यात आली नव्हती.'' तथापि, भारतीय प्रतिनिधींनी कठोर भूमिका घेतल्यावर नक्की यांनी सांगितले की, या विषयावर इतर व्यासपीठावर चर्चा होईल, या बैठकीत नाही.

बीसीसीआयची मागणी

बीसीसीआयने या बैठकीत स्पष्ट मागणी केली आहे की, एशिया कपची ट्रॉफी त्वरित भारतीय संघाला सोपवण्यात यावी. ट्रॉफी न मिळाल्याने भारतीय संघाला विजेतेपदाचा आनंद ट्रॉफीसह साजरा करता आला नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे बीसी-सीआयने म्हटले आहे.

# आशिया कप जिंकल्यावर पाकिस्तानच्या संघाने काय केले असते? -आफ्रिदीन

स्वर्णभूमी न्यूज

आशिया कप २०२५ च्या फायनलमध्ये भारताने पाकिस्तानवर ५ विकेटने विजय मिळवला. यापूर्वी टीम इंडियाने दोनवेळा या स्पर्धेत पाकिस्तानला पराभूत केले. फायनलमध्ये भारताला पराभूत करण्याचं स्वप्न टीम इंडिया पाहत होती मात्र त्यांचं हे स्वप्न स्वप्नच राहिलं. आशिया कप जिंकण्यापूर्वी पाकिस्तान संघाने एक प्लॅन केला होता की जिंकल्यावर काय करायचं. पाकिस्तानचा माजी क्रिकेटर शाहिद आफ्रिदी आणि मोहम्मद युनूस यांनी आधीच हे भाकीत केले होते, परंतु त्यांची स्वप्ने पूर्णपणे भंगल पावली. आशिया कप ट्रॉफीबाबत मैदानात खूप नाटक पाहायला मिळालं. भारताने पाकिस्तानविरुद्ध बहिष्कार कायम ठेवला आणि अंतिम सामन्यात मोहसीन नक्कीकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला.

मात्र नक्की सुद्धा त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिले आणि त्यांनी विजेत्या भारतीय संघाला ट्रॉफी न देताच ती परत नेली. पण ट्रॉफी नसतानाही टीम इंडियाने मोठ्या उत्साहात विजय साजरा केला. पाकिस्तानची स्वप्ने पूर्णपणे भंगली. जर पाकिस्तानने ट्रॉफी जिंकली असती तर त्यांनी कसा आनंद साजरा केला असता याविषयी त्यांच्या माजी खेळाडूंनी सांगितलं होतं.

फायनलपूर्वी पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदी आणि मोहम्मद यूनुसने म्हटले की, जर पाकिस्तान संघ जिंकला तर ते आशिया कपची ट्रॉफी पाकिस्तानच्या वायू सेनेला समर्पित करणार होते. या मोठ्या सामन्यासाठी खेळाडूंना प्रेरित करण्याच्या आशेने त्याने हे सुचवल्याचेही आफ्रिदीने उघड केले. मात्र टीम इंडियाने फायनलचा सामना जिंकला आणि सूर्यकुमार यादवने त्याची संपूर्ण आशिया कप मॅच फी भारतीय सैन्याला आणि पहलगाम हल्ल्यात मृत्यू झालेल्या लोकांना दान केली.सूर्यकुमार यादवने त्याची मॅच फी दान करण्याचा निर्णय घेतल्यावर पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगाने सुद्धा त्याची नक्कल करत पत्रकार परिषदेत सांगितले

# ''ते ट्रॉफी घेऊन पळून गेलेष्ठ'', सूर्याने सांगितले प्रेझेंटेशन सेरेमनीमध्ये नेमके काय घडले?

स्वर्णभूमी न्यूज

दिल्ली – आशिया चषक २०२५ चा विजेता भारतीय संघ जेतेपद आपल्या नावे केल्यानंतर मायदेशी परतला आहे. भारताने अंतिम सामन्यात पाकिस्तानचा ५ विकेट्सने पराभव करत विक्रमी नवव्यांदा या स्पर्धेचे जेतेपद आपल्या नावे केले. पण जेतेपद पटकावल्यानंतर मात्र भारतीय संघ आशिया चषकाची ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. यावरून मोठी चर्चा सुरू आहे, पण सूर्यकुमार यादवने नेमके मैदानावर काय घडले, हे सांगितले आहे.

भारताच्या आशिया चषक विजयानंतर तब्बल सव्वा तास उशिरा प्रेझेंटेशन सेरेमनी सुरू झाली. सूर्यकुमार यादवनुसार पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) प्रमुख मोहसीन नक्की यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर भारतीय खेळाडूंनी जवळजवळ एक तास वाट पाहिली. शेवटी, टीम इंडियाने ट्रॉफीशिवाय आनंद साजरा केला. नक्की हे पाकिस्तानचे गृहमंत्री देखील आहेत.

सूर्यकुमार म्हणाला, ''आम्ही दार बंद करून ड्रेसिंग रूममध्ये गेलो नाही. सादरीकरण समारंभासाठी आम्ही कोणालाही वाट पाहायला लावली नाही. तेच ट्रॉफी घेऊन पळून गेले. मी हेच पाहिलं. काही लोक आमचे व्हिडिओ काढत होते, पण आम्ही तिथेच उभे होतो. आम्ही आत गेलो नाही.''

बीसीसीआय किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून भारतीय संघाने नक्कीकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिल्याची चर्चा होती, परंतु भारतीय कर्णधाराने असे वृत्त फेटाळून लावलं आणि म्हटलं की हा मैदानावर घेतलेला संघाचा निर्णय आहे.

सूर्यकुमार म्हणाला, ''सगळ्यात आधी तर मी हे स्पष्ट करतो की संपूर्ण स्पर्धेत, सरकार किंवा बीसीसीआयकडून कोणीही आम्हाला काही सांगितलं नाही की कोणाकडून ट्रॉफी स्वीकारायची किंवा नाही स्वीकारायची. आम्ही हा निर्णय स्वत: मैदानावर घेतला. ते (एसीसी अधिकारी) स्टेजवर उभे होते आणि आम्ही खाली उभे होतो. मी त्यांना स्टेजवर बोलताना पाहिलं आणि ते कशाबद्दल बोलत होते हे मला माहित नाही. काही चाहत्यांनी त्यांची हुर्यो उडवण्यासही सुरूवात केली. त्यानंतर आम्ही पाहिले की प्रतिनिधी ट्रॉफी घेऊन पळून गेले.''

सूर्यकुमार म्हणाला, सामना संपल्यानंतर भारताचे खेळाडू त्यांचे फोन घेण्यासाठीही ड्रेसिंग रूममध्ये गेले नाहीत. संघाचे सपोर्ट स्टाफ त्यांचे फोन मैदानात घेऊन आले. ''मैदानावरील प्रत्येकजण त्या क्षणाचा आनंद घेत होता. अभिषेक शर्मा, कुलदीप यादव, शिवम दुबे आणि तिलक वर्मा यांना पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण संघाने आनंद साजरा केला. सर्वांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या आणि त्यांच्यासाठी शिट्ट्या वाजवल्या. ही आमची संघ संस्कृती आहे.''

तासाभराने प्रेझेंटेशन सेरेमनी सुरू झाल्यानंतर पाकिस्तानला उपविजेता संघ म्हणून मेडल्स आणि बक्षीसाची रक्कम देण्यात आली. तर स्पर्धेतील काही वैयक्तिक पुरस्कार देण्यात आले. पण त्यानंतर सूत्रसंचालन करत असलेल्या सायमन डुलने भारतीय संघ आज आशिया चषकाची ट्रॉफी स्वीकारणार नसल्याचे जाहीर केले.

# पोलिसांच्या अंगावर कुत्रे सोडणाऱ्या पूजा खेडकरच्या आईला कोर्टाचा दिलासा, बाप फरार

स्वर्णभूमी न्यूज

नवी मुंबई – नवी मुंबईत क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादानंतर ड्रायव्हरचं अपहरण करून डांबून ठेवल्याचा प्रकार खेडकर कुटुंबाने केला होता. या प्रकरणी गुन्हे दाखल झाल्यानंतर दिलीप खेडकर हे फरार आहे तर आईवर गुन्हा दाखल झाला होता. अखेरीस या प्रकरणी खेडकर कुटुंबीयाला न्यायालयाने दिलासा दिला आहे. बेलापूर कोर्टाने मनोरमा खेडकर यांना अ‍ॅन्टिसिपेटरी बेल मंजूर केली असून त्यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. तर दिलीप खेडकर अजूनही फरार आहे.




नवी मुंबईत एका अपघातानंतर ट्रक हेल्परचं अपहरण करण्यात आले होते. अपहरण झालेला बडतर्फ आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या वडिलांच्या पुण्यातील बंगल्यात आढळून आला होता. हे अपहरण पूजा खेडकरचे वडील दिलीप खेडकर आणि त्यांचा अंगरक्षक प्रफुल्ल साळुंखे यांनी मिळून केल्याचं पोलीस तपासात उघड झालं होतं. नवी मुंबई पोलिसांनी या प्रकरणी गुन्हे दाखल केले होते.

पण गेल्या सहा दिवसांपासून दिलीप खेडकर आणि ड्रायव्हर प्रफुल्ल साळुंखे हा फरार आहे. त्यांचा शोध घेण्यासाठी नवी मुंबई पोलिसांच्या तीन वेगवेगळ्या टीम रवाना करण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी रबाळे पोलिसांनी प्रफुल्ल साळुंखेला ताब्यात घेतले होते. मात्र खेडकर कुटुंब सातत्याने फरार असल्यामुळे पोलिसांना मोठं आव्हान निर्माण झाले होते. आज, मात्र मनोरमा खेडकर यांनी स्वत: कोर्टात हजर राहून अ‍ॅन्टिसिपेटरी बेलसाठी अर्ज दाखल केला. न्यायालयाने त्यांचा अर्ज मान्य करण्यात आला. त्यामुळे या प्रकरणात त्यांना तात्पुरता न्यायालयीन दिलासा मिळालेला आहे.

काय आहे प्रकरण?

दिलीप खेडकर आणि त्यांचा अंगरक्षक प्रफुल्ल साळुंखे यांनी मिळून तरुणाचे अपहरण केलं होतं. नवी मुंबई पोलिसांकडून तरुणाची सुखरूप सुटका केली असून नुकसानभरपाईच्या वादावरून अपहरण केल्याचं समोर आलं होतं. १४ सप्टेंबरला मुलुंड ते ऐरोली मार्गावर एक सिमेंट मिक्सर ट्रक आणि एम १२ ई ५००० नंबरच्या लँड क्रूझर गाडीमध्ये अपघात झाला होता. मिक्सर वाहन घेऊन जाणाऱ्या तरुणाची गाडी आणि खेडकर यांच्या गाडीचा अपघात झाल्याने दोघांमध्ये वाद झाला. नुकसानभरपाईचे पैसे न दिल्याने खेडकर यांचा पारा चढला. तरुणाला पोलीस ठाण्यात घेऊन जाण्याचे सांगत थेट पुण्याच्या घरी नेऊन डांबून ठेवले.

डंपर चालकाच्या सहकाऱ्याने पोलिसांत तक्रार केल्यानंतर रबाळे पोलिसांनी एक पथक गाडीचा मागोवा घेत गेले. कारचा मागोवा घेत शोध घेतला, ती गाडी पुण्यातील बाणेर रस्त्यावरील एका बंगल्याबाहेर उभी असल्याचे निष्पन्न झाले. हा बंगला पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांचा असल्याचे समोर आले. पोलिसांनी घरी येऊन दरवाजा उघडण्याची विनंती केली असता, दिलीप खेडकर यांच्या पत्नी मनोरमा खेडकर यांनी दरवाजा उघडण्यास नकार दिला. उलट, पोलिसांवर घरातील कुत्रे सोडले, असा दावा पोलिसांकडून केला होता. खेडकर यांच्या आईने पोलिसांना तपासात मदत न करता पोलिसांशी हुज्जत घातली. त्यानंतर पोलिसांनी मनोरमा खेडकर यांना देखील या प्रकरणात सहआरोपी केले होते.

# जयंतराव, सांग तुझ्या कितव्या बायकोचे मंगळसूत्र मी चोरलेय; दसरा मेळाव्यातून गोपीचंद पडळकर आक्रमक

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई – गेल्या काही दिवसापासून भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगल्याचं चित्र पाहायला मिळतच आहे. गोपीचंद पडळकर हे सातत्याने जयंत पाटील यांच्या खालच्या शब्दात टीका करत आहेत. आज पुन्हा पडळकरांनी जयंत पाटील यांच्यावर जहरी टीका केली आहे. मला मंगळसूत्र चोर म्हणतात, जयंत पाटील यांनी सांगावं त्याच्या कितव्या बायकोचे मी मंगळसूत्र चोरले अशा शब्दात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी टीका केली आहे.

नेमकं काय म्हणाले गोपीचंद पडळकर?

गोपीचंद पडळकर यांनी त्यांच्यावर टीका केलेल्या विरोधकांना शायरीतून उत्तर दिले आहे. बडी सी बडी हस्ती मीट गई मुझे मीटाने मे! 'तेरी उम्र जायेगी मुझे मिटाने मे असे म्हणत गोपीचंद पडळकर यांनी विरोधकांवर



निशाणा साधला. जयंत पाटील यांच्यावर देखील जहरी टीका पडळकरांनी केली आहे. मला मंगळसूत्र चोर म्हणतात, जयंत पाटील यांनी सांगावं त्याच्या कितव्या बायकोचे मी मंगळसूत्र चोरले. मंगळसूत्र चोरीच्या आरोपावरून गोपीचंद पडळकर यांची पुन्हा एकदा जयंत पाटील यांच्यावर टीका केली आहे.

गेल्या काही दिवसापूर्वी देखील पडळकर यांनी जयंत पाटील यांच्यावर टीका केली होती. मला एका कंत्राटदाराच्या आत्महत्या प्रकरणात अडवकण्यासाठी जयंत पाटलांनी प्रयत्न केला. याने महाराष्ट्र कसा चालवला, जयंत पाटील हा बिनडोक माणूस आहे. दर आठ दिवसाला हा आपण किती बिनडोक आहे हे जयंत पाटील सिद्ध करतोय. फंडाबाबत आमदार पत्र देऊ शकतो. त्या व्यतिरिक्त आमदाराचा आणि कंत्राटदाराचा काही संबंध येत नाही. जयंत पाटलाचे काम फक्त गोपीचंद पडळकरला बदनाम करण्याचं आहे. पण मी काय आता आलोय का? असे अनेक अंगावर घेऊन आलोय. या प्रस्थापितांच्या सत्ताकारणामध्ये दोन–दोन महिने मी जेलमध्ये जाऊन आलोय. जतमध्ये जयंत पाटलांनी माणसे पाठवली. गोपीचंद पडळकरांनी कोणत्या व्यापाऱ्याकडून पैसे घेतले का याची माहिती घेतली. जर मी कुणाकडून पैसे घेतले असतील तर खंडणीचा गुन्हा दाखल करता येतो का पाहिले. पण हा गोपीचंद पडळकर जयंत पाटलासारखा भिकाऱ्याची औलाद नाही. कार्यक्रम घेण्याची धमक आपल्यामध्ये आहे. हा जयंत पाटील राजारामबापू पाटील यांची औलाद नसणार आहे. काहीतरी गडबड आहे अशी टीका पडळकरांनी केली होती.

# महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरण,
## राज्यात ४०० केंद्रांच्या माध्यमातून चार लाख रोजगार

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई – शहरी आणि ग्रामीण भागात सर्वसमावेशक विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि प्रशासकीय गतिमानतेवर भर देणारे महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५ राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या धोरणामुळे राज्यात ५० हजार ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक व त्यातून सुमारे चार लाख रोजगार निर्मिती होईल, असे अपेक्षित आहे. या धोरणाचा कालावधी २०२५ ते २०३० असा राहणार आहे.

धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये

भारतातील जागतिक क्षमता केंद्रे उद्योगांच्या गरजा पुरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावित आहेत. सन २०२१ मध्ये भारतातील जागतिक क्षमता केंद्रांची संख्या सुमारे १२०० होती आता ती १९०० पेक्षा जास्त झाली आहे. या केंद्रातून सुमारे १९ लाख लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. राज्यात सध्या ४०० जागतिक क्षमता केंद्रे असून त्यामधून सुमारे ४ लाख लोकांना रोजगार मिळालेला आहे. या धोरण कालावधीत आणखी ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्रे स्थापन करणे, चार लाख कुशल रोजगार निर्मिती करणे, उच्चमूल्याची जागतिक गुंतवणूक आकर्षित करणे, जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र आणि डिजिटल डेटाबँक निर्माण करणे आणि राज्यातील नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या सारख्या टिअर–२, टिअर–३ शहरामध्ये जागतिक क्षमता केंद्रांचा विस्तार करणे ही या धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ दृष्टिकोनाशी सुसंगत ३० ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था असलेले राष्ट्र बनविण्याचे उद्दिष्ट आहे.



हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन जागतिक क्षमता केंद्र आकर्षित करणे, संशोधनाला चालना देणे, उच्च मूल्यवान ज्ञानकेंद्रीत गुंतवणूक आकर्षित करणे, डिजिटल डेटाबँक विकसित करणे, वित्तीय आणि बिगरवित्तीय प्रोत्साहने, व्यवसाय सुलभता, संस्थात्मक संरचना आणि केंद्र आणि राज्य शासनाच्या धोरणांचे एकत्रिकरण करणे आवश्यक आहे. यासाठी जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५ निश्चित करण्यात आले आहे.

या धोरणामुळे अवकाश आणि संरक्षण, कृषी आणि अन्न प्रक्रिया, रत्ने व दागिने, लॉजिस्टिक्स, धातू खाणकाम, औषध निर्माण व रसायने, अक्षय आणि हरित ऊर्जा, वस्त्रोद्योग, माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोटिव्ह अशा प्राधान्य क्षेत्रांना गती मिळणार आहे.

कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गुजरात या राज्यांनी स्वतंत्र जागतिक क्षमता केंद्र धोरण जाहीर केले आहे. महाराष्ट्राचे उद्योग आणि नवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील अग्रस्थान कायम टिकविण्यासाठी हे धोरण सहाय्यभूत ठरेल. जागतिक क्षमता केंद्रामध्ये औद्योगिक प्रकल्प सुरु करण्यासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र, अत्यावश्यक पायाभूत सुविधा निधी, औद्योगिक वसाहतीतील राखीव भूखंड, अखंडित पाणी व वीजपुरवठा, कामकाजाच्या वेळामध्ये शिथिलता आणि मालमत्ता करांबाबत प्रोत्साहन दिले जाण्याची तरतूद आहे.

# कर्करोग उपचारासाठी सर्वसमावेशक धोरण महाकेअर फाऊंडेशनची स्थापना रुग्णालयांमध्ये दर्जेदार उपचार

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई – राज्यातील कर्करोगग्रस्तांना दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी सर्वसमावेशक कर्करोग सेवा धोरण निश्चित करण्यात आले. यासाठी महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन (महाकेअर फाऊंडेशन) कंपनी स्थापन करण्यास तसेच या माध्यमातून राज्यभरातील १८ रुग्णालयांतून कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यामुळे राज्यात कर्करोगाशी संबंधित डे–केअर केंद्रांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे.

या धोरणानुसार कर्करोग रुग्णालयांची एल–१, एल– २, आणि एल □३ अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली आहे. या केंद्रांच्या माध्यमातून रेडिओथेरपी, केमोथेरपी तसेच पदव्युत्तर व अतिविशेषोपचार शिक्षण, सर्व प्रकारच्या कर्करोगांचे निदान, शस्त्रक्रिया, भौतिकोपचार, मानसिक आधार व उपचार, संशोधन यासह पॅलेटिव्ह उपचार, औषध सुविधा यांची उपलब्धता तसेच जनजागृतीचे उपक्रम राबविले जाणार आहेत.

यात टाटा स्मारक रुग्णालय ही संस्था एल □१ स्तरावरील शिखर संस्था म्हणून निश्चित करण्यात आली आहे. तर छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, सर ज. जी. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मुंबई (जे. जे.), छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय कोल्हापूर, बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे, येथील ६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालये तसेच नाशिक व अमरावती येथील सार्वजनिक आरोग्य विभागाची दोन संदर्भ सेवा रुग्णालये अशी एकूण आठ केंद्र ही एल □२ केंद्र म्हणून निश्चित करण्यात आली आहेत. तर अंबाजोगाई (बीड), नांदेड, यवतमाळ, मुंबई (कामा व आल्ब्लेस रुग्णालय), सातारा, बारामती, जळगांव व रत्नागिरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्नित ८ रूग्णालये व शिर्डी संस्थानचे रुग्णालय अशी एकूण नऊ रुग्णालये एल □३ स्तर केंद्र म्हणून निश्चित करण्यात आली आहेत.




या धोरणानुसार छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबई (जे. जे.), कोल्हापूर, पुणे ( बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय) येथील ६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न तसेच नाशिक व अमरावती येथील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील संदर्भ सेवा रुग्णालये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न करून या एल–२ स्तर रूग्णालयांमध्ये कर्करोगासंबंधी पदव्युत्तर व अतिविशेषोपचार शिक्षण म्हणजेच एमडी, एमएस, डीएम–एमसीएच, डीएनबीसाठी फेलोशिप उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या एल –२, एल □३ केंद्रांना आवश्यकतेनुसार मनुष्यबळ, निधी उपलब्धता, मार्गदर्शन या अनुषंगाने ''महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाउंडेशन'' ही कंपनी स्थापन करण्यात येणार आहे. याशिवाय या सर्व केंद्रांमधील समन्वयासाठी कमांड अँड कंट्रोल सेंटर स्थापन करण्यात येणार आहे.

या फाऊंडेशनच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी तज्ज्ञ कार्यकारी मंडळ नियुक्त केले जाईल. फाऊंडेशनला कर्करोगावर उपचारासाठी पॅलिटिव्ह केअर उपक्रमात स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेता येणार आहे. कर्करोगावर नवनवीन उपचार पद्धती विकसित करण्याबरोबरच, स्थानिक पातळीवर कर्करोगासह सुयोग्य व किफायतशीर अशा आरोग्यविषयक कार्यक्रमांची आखणी केली जाणार आहे. आरोग्य सेवांमध्ये संशोधन आणि आजार टाळण्यासाठी जीवनशैलीतील बदलांबाबत जागरूकता वाढवण्याचे उपक्रम राबविले जाणार आहेत. देशातील व राज्यातील आरोग्य सेवा केंद्रांमध्ये माहितीचे देवाणघेवाण सुलभ व्हावी यासाठी फाऊंडेशन काम करणार आहे.

महाकेअर फाऊंडेशनला भागभांडवल म्हणून सुरुवातीला शंभर कोटी इतका निधी म्हणून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कर्करोग रुग्णालयांना मिळणाऱ्या शुल्कापैकी २० टक्के शुल्क महाकेअर फाऊंडेशनला देण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

याशिवाय फाऊंडेशन क्लिनिकल ट्रायल्समधून निधीची उभारणी करणार आहे. तसेच या फाऊंडेशनला आवश्यकतेनुसार आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फत देणग्या, अनुदाने, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत निधी उभारता येणार आहे. यामुळे फाऊंडेशनला कर्करोगाव्यतिरिक्त वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागांतर्गत इतर प्रकल्पांसाठी देखील निधी उभा करता येणार आहे.

# आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा च्यावतीने आरक्षण अंमल मेळावा आज




स्वर्णभूमी न्यूज

नागपूर – आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा च्यावतीने राष्ट्रीय अध्यक्ष नारायणराव बागडे यांच्या नेतृत्वाखाली पत्र परिषद घेण्यात आली. तेव्हा त्यांनी सांगितले की, येणारा धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा च्यावतीने आरक्षण अंमल मेळाव्याचे आयोजन टिळक पत्रकार भवन धंतोली नागपूर च्या सभागृहात १ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे, उद्घाटन चंद्रकांत सोनवणे, प्रमुख पाहुणे कृष्णा बेडसे, उद्धव तायडे, दशरथ कांबळे, विकास काटे, प्रा. संध्या रायठक, मंगला बिहारे, डॉ. आशा पारधे, नामदेवराव निकोसे, प्रा. सुधा जनबंधू, राधाबाई पाटील, धर्माजी बागडे, देवेंद्र बागडे हे उपस्थित राहतील. या मेळाव्याचे आयोजक प्रा. रमेश दुपारे सुखदेवराव मेश्राम, शालिक बांगर हे राहणार आहे. मेळाव्यात राज्यातील आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या प्रणित महिला मोर्चा, युवा मोर्चा, विद्यार्थी मोर्चा, कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी राहणार असल्याची माहिती बागडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# स्टेज तुटले आणि आमदार नरेंद्र भोंडेकर खाली पडले

स्वर्णभूमी न्यूज

भंडारा – सध्या नवरात्र सुरू असून भंडारा विधानसभा क्षेत्राचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या वतीने पवनी शहरात शहनाज अख्तर यांच्या गाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गाण्याचा कार्यक्रम सुरू असताना आमदार व कार्यकर्ते स्टेजवर चढले व नाचत असताना स्टेज तुटला यात आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्यासह काही कार्यकर्ते देखील खाली कोसळले. यात काहींना जास्त दुखापत झाली असल्याचे बोलले जात आहे. यात नरेंद्र भोंडेकर यांना किरकोळ इजा झाली असल्याचे समजते. सध्या हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

भंडारा विधानसभा क्षेत्राचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या वतीने पवनी शहरात शहनाज अख्तर यांच्या गाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गाण्याचा कार्यक्रम सुरू असताना आमदार व कार्यकर्ते स्टेजवर चढले व नाचत असताना स्टेज तुटला यात आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्यासह काही कार्यकर्ते देखील खाली कोसळले. घटना घडताच उपस्थित पोलिस कर्मचारी तसेच कार्यकर्त्यांनी मदतीसाठी धाव घेतली.



दरम्यान, पवनी येथे आयोजित होत असलेल्या विदर्भ काशी पवनी महोत्सवाचे आज समारोप करण्यात आले. पाच दिवसीय या महोत्सव दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्यात मॅरथॉन दौड, स्टँडिंग कॉमेडीचा बादशाह सुनील पाल व भजन गायक शहनाज अख्तर हे पवनी करीता आकर्षण ठरले. आज या महोत्सवाचे समारोप गरबा व दांडिया स्पर्धेने करण्यात आला. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधत २६ सप्टेंबर पासून पाच दिवसीय ''विदर्भ काशी पवनी महोत्सव'' सुरू करण्यात आला. आमदार नरेंद्र भोंडेकर मित्र परिवारतर्फे आयोजित या महोत्सव अंतर्गत शुक्रवारी सकाळी पवनी शहरात माह मॅरथॉन दौड आयोजित करण्यात अली, ज्यात ५०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी भाग घेतला. ही दौड सकाळी ७ वाजता कालका माता मंदिर येथून सुरू करण्यात आली. ज्या करीता विविध वयोगट तयार करण्यात आले होते आणि यात विजयी झालेल्या स्पर्धकांना स्मृतिचिन्हे व नगदी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याच दिवशी सायंकाळी ६ वाजता महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पवनी येथील श्री चंडिका माता मंदिर येथे महाअ–ारतीने या महोत्सवाची सुरुवात करण्यात अली. या वेळी नरेंद्र भोंडेकर यांनी उपस्थित राहून महोत्सवाचे उद्घाटन केले.

महोत्सवा दरम्यान शनिवारी सकाळी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यासाठी संस्कार भारती आणि पोस्टर रंगोली असे दोन विभाग पाडण्यात आले होते, ज्यात विजयी स्पर्धकांना स्मृतिचिन्हे व नगदी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सायंकाळी ७ वाजता सिने कलाकार व दि ग्रेट इंडियन लाफ्टर चॅलेंज शोचे विजेता सुनील पाल यांच्या कॉमेडी शोने पवनी वासियांना मनसोक्त हसवले. हा शो पवनी येथील नूतन दुर्गा उत्सव मंडळ चावडी मैदानात आयोजित करण्यात आला होता. याच प्रमाणे सोमवारी सायंकाळी सुप्रसिद्ध भजन गायिका शहनाज अख्तर यांची भजन संध्या ने संपूर्ण पवनी शहर श्रीराममई झाले. वरील संपूर्ण आयोजन नरेंद्र भोंडेकर मित्र मंडळ, शिवसेना, युवा सेना तसेच महिला आघाडी द्वारे करण्यात आले होते.

# चिंचभवन परिसरात मनपा अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या हस्ते वृक्षारोपण

स्वर्णभूमी न्यूज



नागपूर – केंद्र शासनाच्या स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकाद्वारे मंगळवारी (ता.३०) एक पेड माँ के नाम उपक्रम राबविण्यात आला. उपक्रमांतर्गत मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी भारतीय विद्या भवन मंदिर जवळ, चिंचभवन परिसरात वृक्षारोपण करीत पर्यावरणरक्षणाचा संदेश दिला.

याप्रसंगी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त श्री. राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी श्री. मनीष सोनी, झोनल अधिकारी श्री. राजेश गायधने यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी–कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या नेतृत्वात नागपूर महानगरपालिकेद्वारा स्वच्छोत्सव या संकल्पनेस अनुसरून स्वच्छता ही सेवा हे अभियान राबविण्यात येत आहे. स्वच्छोत्सव या संकल्प–नेनुसार नागपूर महानगरपालिकेद्वारे 'एक पेड माँ के नाम राबविण्यात आला. याशिवाय बॅकलेन स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच मंगळवारी सकाळी विविध ठिकाणी प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त पणे आपला सहभाग नोंदवला.

# २ ऑक्टोबरला नागपुरात राष्ट्रीय पथसंचलनाचे आयोजन

स्वर्णभूमी न्यूज

नागपूर – (बीएस ४) भारतीय संविधान सन्मान, सुरक्षा, संवर्धन यांच्या अंतर्गत २ ऑक्टोबरला नागपुरात राष्ट्रीय पथसंचलनाचे आयोजन पथसंचलन दुपारी ४ वाजता संविधान चौकातून सुरुवात होणार असून इंदोरा मैदान येथे सायंकाळी ६ वाजता गणसभेला सुरुवात होईल. भारतीय संविधान, सन्मान सुरक्षा आणि संवर्धन (बीएस ४) अभियान अंतर्गत गुरुवार २ ऑक्टोबर रोजी अशोका धम्म विजया दशमीदिनी नागपूरात पथसंचलन व गणसभेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४:०० वाजता संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पथसंचलन सुरु होणार असून समारोप संविधान मैदान (इंदोरा मैदान) येथे होणार आहे. पथ संचलना नंतर सायंकाळी ६:०० वाजता गणसभेला सुरुवात होईल. या गण सभेला मुख्य अतिथी शीतल मरकाम (गोंडवाना मुक्ती सेना, नागपूर), विशेष अतिथी डॉ.के.एस.चौहान (वरिष्ठ अधिवक्ता, सुप्रीम कोर्ट, दिल्ली), प्रा.डॉ.विकास जांभुळकर (फुले – आंबेडकरवादी विचारवंत, नागपूर) मान्यवर वक्ते राष्ट्रीय करणाकडून राज्य समाजवादापर्यंत या विषयावर मार्गदर्शन करतील. सदर गण सभेची अध्यक्षता बामसेफचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि.आर. एल.ध्रुव करतील. राष्ट्रीय संविधान पथ संचलन ही एक व्यापक जनसंपर्क मोहीम आहे आणि सार्वजनिक संवादाचे माध्यम आहे. तशीच ती जनचळवळीच्या वाढत्या प्रभावाची वार्षिक घोषणा सुद्धा आहे. ही प्रगतीशील सभ्यता आणि कलेचा एक नवीन आयाम आहे. अशोक धम्म विजया दशमीच्या निमित्ताने, लोकशाहीच्या वारशाचा आणि प्रगतीच्या नवीन आणि प्रगत मार्गांचा स्पष्ट संदेश येथून राष्ट्राला दिला जाईल आणि कळवला जाईल. या वर्षी, बीएस–४ अभियान कार्यक्रमांतर्गत, देश भरातील १,००० निवडक संविधान प्रबोधक उपस्थित राहतील. तसेच ४ अभियान अंतर्गत ''राष्ट्रीयीकरणाचा अजेंडा'' घेऊन नागपूरच्या ऐतिहासिक ''संविधान चौक'' पासून इंदोरा मैदान (संविधान मैदान) पर्यंत त्यांच्या संघटित आणि शिस्तबद्ध मोर्चाचे नेतृत्व करतील. या कार्यक्रमाचे प्राथमिक उद्दिष्ट सामान्य जनतेपर्यंत या विषयाची व्याप्ती, महत्त्व आणि प्रासंगिकता पोहोचविणे आहे. नागरिकांनी पथ संचलनात व गण सभेत सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन बामसेफचे राष्ट्रीय संघटन सचिव संजय मोहिते यांनी केले

# दीक्षाभूमी परिसरात नियंत्रण कक्षाचे आयुक्त डॉ. चौधरी यांच्या हस्ते उद्घाटन

स्वर्णभूमी न्यूज

नागपूर – ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तनाच्या कार्यक्रमाला नागपुरात येणाऱ्या लाखो अनुयायांना आवश्यक नागरी सुविधा पुरविण्यासाठी नागपूर महानगरपालिकेचे पूर्ण प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सोहळ्यासाठी आलेल्या अनुयायांना नागरी सुविधांची माहिती देण्यासाठी दीक्षाभूमी परिसरात महानगरपालिकेने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळ उभारलेल्या नियंत्रण कक्षाचे मंगळवारी (ता:३०) डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन (ता. ३०) करण्यात आले. यावेळी दीक्षाभूमी परिसरात महानगरपालिकेने पुरविलेल्या नागरी सुविधांची माहिती संकलित केलेल्या व्यवस्थापन माहिती पुस्तिकेचे प्रकाशन सुद्धा आयुक्त डॉ. चौधरी यांच्या हस्ते झाले. यावेळी अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, श्रीमती वैष्णवी बी, मुख्य अभियंता श्री. मनोज तालेवार, उपायुक्त श्री. मिलिंद मेश्राम, उपायुक्त श्री राजेश भगत, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. तुषार बारहाते, उपद्रव शोध पथकाचे पथक प्रमुख श्री वीरसेन तांबे, कार्यकारी अभियंता सर्वश्री रवींद्र बुंधाडे, राजेश दुफारे,



श्रीकांत वाईकर, राजेंद्र राठोड यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. हा नियंत्रण कक्ष २४ तास सुरू राहणार आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा हा नागपूरचा एक अभिमानाचा व गौरवाचा भाग असल्याचे सांगून डॉ. चौधरी यांनी राज्यातून व परराज्यातून येणाऱ्या धम्म बांधवांना चांगल्या सुविधा देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. त्यांना नागरी सुविधा देण्यासाठी सर्व व्यवस्था महानगरपालिका प्रशासनाने केली आहे. लाखोंच्या संख्येने येणाऱ्या या अनुयायांना नागरी सुविधा पुरविणे हे एक आव्हान आहे. पुढील तीन दिवस महानगरपालिकेचे अधिकारी व सर्व कर्मचारी अहोरात्र काम करीत आहेत. परंतु, अनुयायांच्या अडचणी दूर करण्याची जबाबादीर आपली आहे. या भावनेने सर्व कर्मचाऱ्यांनी काम करावे व या पवित्र सोहळ्याला उपस्थित राहून आपल्या गावी जाणाऱ्या अनुयायांच्या मनात नागपूरची एक चांगली प्रतिमा निर्माण झाली पाहिजे, यासाठी आपण सर्व काही दिवस प्रयत्न करू या, असे आवाहन त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी केले.

प्रारंभी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांचे पुष्प–गुच्छ देऊन स्वागत उपायुक्त श्री. मिलिंद मेश्राम यांनी केले. तर अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांचे स्वागत कार्यकारी अभियंता रविंद्र बुंधाडे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी श्री. मनीष सोनी यांनी केले.

अशी आहे व्यवस्थापन माहिती पुस्तिका

नागपूर महानगरपालिकेने ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त येणाऱ्या अनुयांना माहिती देण्यासाठी नागरी सुविधांची संपूर्ण माहिती देण्यासाठी ५१ पानांची व्यवस्थापन माहिती पुस्तिका २०२५ प्रसिद्ध केली आहे. या पुस्तिकेमध्ये नियंत्रण कक्षातील जबाबदारी अधिकारी व त्यांचे दूरध्वनी क्रमांक नमूद केले आहे. .याशिवाय घनकचरा व्यवस्थापन, पाण्याची व्यवस्था, शौचालय बांधकाम व मंडप उभारणी व्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन, परिवहन व्यवस्थापन, वैद्यकीय आरोग्य व्यवस्था, आपत्ती व्यवस्थापनाची माहिती व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोबाईल क्रमांक नमूद केलेले आहेत.


## जाहिर सुचना

मी श्रीमती, सुनिता देवी राह. क्वाटर नं. ए२–१३, बिल्डिंग नं. ए२, माइल लिमिटेड छावणी, काटोल रोड, नागपूर ४४००१३ माझे पती नामे शशि कुमार यांचे दिनांक ८ जानेवारी २०२४ रोजी निधन झाले. त्यांच्या नावे असलेली चार चाकी कार (**WAGON R**) गाडी आहे. जीचा गाडी नं. (**MH31 FU 8474**) आहे जिचा चेचीस नं. **MA3JMTC1SPB860678** इंजिन नंबर **K12NN1005331** आहे,

मी श्रीमती, सुनिता देवी त्यांची पत्नी असुन त्या गाडीची कायदेशीर वारस असल्याने सदर गाडी माझ्या नावे हस्तांतरीत करण्याकरीता प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर शहर , नागपूर येथे पेपर्स सादर केलेले आहे. सदर वाहन बाबत जर कोणाचा उजर, हक्क असेल तर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर शहर, नागपूर येथे वा खालील पत्त्यावर संपर्क करावा अन्यथा आपल्या कोणाचीही तक्रार नाही असे गृहीत धरुन सदर वाहन माझ्या नावाने हस्तांतर केले जाईल याची नोंद घ्यावी.

**श्रीमती, सुनिता देवी**

राह. क्वाटर नं. ए२–१३, बिल्डिंग नं. ए२, माइल लिमिटेड छावणी, काटोल रोड, नागपूर ४४००१३

**मोबा. नं. ९०१३३१८२६०**

# अमित शाह यांनी माजी खासदार आणि ज्येष्ठ नेते विजय कुमार मल्होत्रा यांच्या निधनाबद्दल व्यक्त केला तीव्र शोक

स्वर्णभूमी न्यूज

नवी दिल्ली - केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी माजी खासदार आणि ज्येष्ठ नेते विजय कुमार मल्होत्रा यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. नवी दिल्ली येथे अमित शाह यांनी दिवंगत नेत्याच्या पार्थिवावर पुष्पांजली अर्पण केली.



केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री यांनी 'एक्स' वरील पोस्टमध्ये म्हटले आहे, की संघटनेला आकार देण्यात आणि त्याचा विस्तार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे ज्येष्ठ नेते विजय कुमार मल्होत्रा जी यांच्या निधनाने खूप दु:ख झाले आहे. दिल्लीचे प्रदेशाध्यक्ष, दिल्ली विधानसभेतील विरोधी पक्षनेते तसेच लोकप्रतिनिधी म्हणून, विजय कुमार मल्होत्रा जी यांनी आपल्या प्रत्येक भूमिकेतून देशाची आणि दिल्लीच्या जनतेची सेवा केली.

अमित शाह पुढे म्हणाले की, मल्होत्रांजींच्या सोबत झालेल्या प्रत्येक भेटीत संघटनात्मक बाबींविषयी मौल्यवान माहिती मिळाली. या दु:खाच्या प्रसंगी, संपूर्ण पक्षपरिवार त्यांच्या कुटुंबियांसोबत आहे.ओम शांती शांती शांती!

एक्स पोस्टवर अमित शाह म्हणाले,

''विजय कुमार मल्होत्रा जी यांनी केवळ दिल्लीतील पक्षाचे संघटन मजबूत केले असे नव्हे तर विविध जबाबदाऱ्या सांभाळत नेहमीच सार्वजनिक समस्या सोडवण्यास प्राधान्य दिले. आज त्यांच्या पार्थिवाला श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

जनसंघापासून जनता पक्ष आणि भाजपापर्यंत संघटनेला आकार देण्यात आणि तिचा विस्तार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे भाजपाचे ज्येष्ठ नेते विजय कुमार मल्होत्रा जी यांच्या निधनाने अतिशय दु:ख झाले.

# 'अन्यथा दु:खद अंत असेल', डोनाल्ड ट्रम्पची हमासला धमकी

स्वर्णभूमी न्यूज

दिल्ली - अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने कोणत्या न कोणत्या कारणांनी चर्चेत असतात. एवढंच नाही तर ट्रम्प सातत्याने वेगवेगळे दावे करताना पाहायला मिळतात. काही दिवसांपूर्वी भारत व पाकिस्तान संघर्षाबाबतही त्यांनी वेगवेगळे दावे करत भारत-पाकिस्तानमधील संघर्ष आपण थांबवल्याचं त्यांनी म्हटलं होतं, अर्थात त्यानंतर हे दावे भारताने फेटाळून लावले.

त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प हे इस्रायल आणि हमासमध्ये गाझा पट्टीत सुरू असलेला संघर्ष थांबवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. यासाठी ट्रम्प यांनी २० कलमी कार्यक्रम देखील ठरवला आहे. याबाबत इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी २० कलमी कार्यक्रम जाहीर केला आहे. तसेच हा २० कलमी युद्धबंदीचा प्रस्ताव हमासने स्वीकारण्यासाठी ट्रम्प दबाव निर्माण करत असल्याचं दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठं विधान करत हमासला धमकी दिली आहे. पुढील ३-४ दिवसांत शांतता प्रस्ताव स्वीकारा, अन्यथा दु:खद अंत असेल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. त्यांच्या या विधानानंतर आता हमास काय भूमिका घेणार? ट्रम्प यांचा २० कलमी युद्धबंदीचा प्रस्ताव हमास स्वीकारणार का? याकडे जगाचं लक्ष लागलं आहे. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांनी काय म्हटलं?

''हमासला त्यांच्या २० कलमी शांतता प्रस्तावाला प्रतिसाद देण्यासाठी ३ ते ४ दिवसांचा अवधी आहे. ७२ तासांच्या आत हमासकडून ओलिसांची सुटका, हमासचे नि:शस्त्रीकरण आणि इस्रायलने गाझामधून हळूहळू माघार घ्यावी. यावर इतर सर्व पक्षांनी स्वाक्षरी केली. आम्ही फक्त हमासची वाट पाहत आहोत. सर्व अरब देशांनीही स्वाक्षरी केली. सर्व मुस्लिम देशांनी स्वाक्षरी केली. इस्रायलने स्वाक्षरी केली. आम्ही फक्त हमासची वाट पाहत आहोत. हमास या प्रस्तावाला प्रतिसाद देणार की नाही? ते पाहू. जर असे झाले नाही तर त्याचा शेवट खूप दु:खद असेल'', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले.

२० कलमी प्रस्तावात काय आहे?

वृत्तानुसार, या प्रस्तावातील तरतुदी गाझा प्रशासनानं मान्य करण्यावर युद्धबंदी अवलंबून असेल. त्यात प्रामुख्याने गाझामधील हमासच्या दहशतवाद्यांनी ओलीस ठेवलेल्या इस्रायलच्या नागरिकांना जिवंत अथवा मृत ७२ तासांत इस्रायलच्या हवाली करण्याचा मुद्दा समाविष्ट आहे. तसेच, आगामी काळात हमासचा गाझाच्या प्रशासनात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप नसेल, असंही नमूद करण्यात आलं आहे. ट्रम्प यांनी मांडलेला हा २० कलमी प्रस्ताव त्यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केलेल्या नवीन गाझा उभारण्याच्या उद्देशाचा एक भाग असल्याचं सांगण्यात आलं आहे. युद्धबंदीसाठी मध्यस्थी करणाऱ्या मध्यस्थांना या मुद्द्यांवर दोन्ही बाजूच्या प्रमुखांशी चर्चा करण्यास सांगण्यात आले आहे.

# भारताची सध्याची सुमारे २७.८ अब्ज अमेरिकन डॉलर्स मूल्यांची औषध निर्यात

स्वर्णभूमी न्यूज

नवी दिल्ली - भारताची औषध निर्यात, जी सध्या सुमारे २७.८ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी आहे, ती या वर्षाच्या अखेरीस ३० अब्ज अमेरिकन डॉलर्सचा टप्पा ओलांडण्याची शक्यता आहे, असे केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह यांनी आज सांगितले.दरम्यान, मंत्र्यांनी सांगितले की भारताची देशांतर्गत औषध बाजारपेठ ६० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी आहे, जी २०३० पर्यंत आताच्या दुप्पट म्हणजेच सुमारे १३० अब्ज अमेरिकन डॉलर्स होण्याची शक्यता आहे. भारत सरकारचा जैवतंत्रज्ञान विभाग आणि उत्तर प्रदेश सरकार यांच्यातील अधिकृत सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर सिंह बोलत होते. सध्या देशात सुमारे ८०० वैद्यकीय उपकरण उत्पादक आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. भारताची वैद्यकीय तंत्रज्ञान क्षेत्रातील वार्षिक वाढ १५ ते २०म आहे, असे डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले.भारतातील जैवतंत्रज्ञान प्रणालीच्या झपाट्याने झालेल्या विस्ताराबद्दल बोलताना डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले की २०१४ मध्ये देशात सुमारे ५० स्टार्टअप्स होते, त्यांची संख्या आज ११,००० हून अधिक झाली आहे. हे या क्षेत्राच्या क्षमतेचे दर्शक आहे तसेच यामुळे देशाच्या आर्थिक आणि आरोग्यसेवा उद्दिष्टांना चालना मिळत आहे, असे त्यांनी सांगितले. भारत आता लसींचा जागतिक पुरवठादार म्हणून ओळखला जातो, कारण जगातील ६० टक्क्यांहून अधिक लसी भारतात उत्पादित केल्या जातात आणि २०० हून अधिक देशांना भारतीय लसींच्या मात्रा पुरवल्या जातात, असे ते म्हणाले. या वाढीचे श्रेय त्यांनी धोरणात्मक सहाय्य आणि 'समन्वित शासकीय दृष्टिकोन' यांना दिले, ज्या अंतर्गत डीबीटी आणि त्याच्या संस्था राज्यांशी भागिदारी निर्माण करण्यासाठी सतत संपर्क साधत आहेत, असे ते म्हणाले. नवीन डीबीटी-यूपी करारासारख्या भागीदारीमुळे ''विकसित भारत २०४७'' या दृष्टिकोनाला पुढे नेण्यास मदत होईल आणि ''मेड इन इंडिया मेड फॉर द वर्ल्ड'' या ध्येयानुसार परवडणारी आरोग्यसेवा उपाय प्रदाता म्हणून भारताचे स्थान मजबूत होईल,

# तस्लीमा नसरीन म्हणाल्या, ''सगळे बंगाली भारताचेच आहेत, अरबष्ठ'', जावेद अख्तर यांनी दिलेले उत्तर चर्चेत

स्वर्णभूमी न्यूज

दिल्ली - निर्वासित बांगलादेशी लेखिका तस्लीमा नसरीन यांनी म्हटले आहे की हिंदू संस्कृती ही बंगाली संस्कृतीचा आधार आहे. बंगाली संस्कृतीत येणारे मुस्लिमही त्यात येतात. याबाबत लेखक आणि कवी जावेद अख्तर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पश्चिम बंगालमध्ये सध्या दुर्गा पूजेचा उत्सव साजरा होतो आहे. त्याचवेळी तस्लीमा नसरीन यांनी केलेली पोस्ट आणि जावेद अख्तर यांनी त्यांना दिलेलं उत्तर दोन्ही चर्चेत आलं आहे.

तस्लीमा नसरीन काय म्हणाल्या?

तस्लीमा नसरीन यांनी दुर्गा पूजेचे फोटो पोस्ट केले. त्यानंतर त्या म्हणाल्या हिंदू संस्कृती हाच बंगालच्या संस्कृतीचा पाया आहे. बंगाली लोकांची खरी ओळख ही हिंदू संस्कृतीमुळेच आहे. आमची राष्ट्रीय ओळखही भारताशीच संबंधित आहे. बंगाली मग तो हिंदू असो किंवा मुस्लिम या सगळ्यांचं नातं भारताशी आणि भारतीय संस्कृतीशी आहे. कुणी बंगाली मुस्लिम असेल तरीही त्याची संस्कृती अरब देशांची नाही तर



भारताचीच आहे. बंगाली संस्कृतीची मूळं भारताच्या परंपरेत रुजली आहेत. ढोलावर पडलेली थाप, संगीत, नृत्य या सगळ्या गोष्टी बंगाली संस्कृतीच्या आत्म्यासारख्या आहेत. या गोष्टींना नाकारणं म्हणजे स्वत:ला नाकारण्यासारखे आहे. तस्लीमा नसरीन यांच्या या पोस्टवर जावेद अख्तर यांनी उत्तर दिले आहे.

जावेद अख्तर यांनी काय म्हटले आहे?

जावेद अख्तर यांनी तस्लीमा नसरीन यांच्या विचारांबाबत सहमती दर्शवली आहे. मात्र त्यांनी हे देखील म्हटले आहे की आम्ही अवधी आहोत. अवधी लोक बंगाली संस्कृती, भाषा आणि साहित्य यांचा सन्मान करतो. पण कुणाला जर गंगा आणि यमुना यांच्या आदराची परंपरा कळत नसेल तर ती त्या व्यक्तीतली कमतरता आहे. ही संस्कृती अरब देशांशी जोडलेली नाही. तसंच पारशी, मध्य आशियातील संस्कृतीही आपल्या परंपरांशी जोडल्या गेल्या आहेत. मात्र ते अटी-शर्तींवर जोडले गेले आहेत. असेच बंगालमध्येही दिसते. बंगालमध्ये अनेक आडनावे ही पारशी मूळ असलेली आहेत. असे उत्तर जावेद अख्तर यांनी दिले आहे.

काही युजर्स म्हणत आहेत की तस्लीमा नसरीन यांनी जे सांगितले ते ऐतिहासिक सत्य आहेत. बंगाली मुस्लिम त्यांचे रिती रिवाज, खाणे पिणे आणि भाषा हे सगळे हिंदू संस्कृतीशी जोडलं गेलं आहे. तर काही युजर्स असे म्हणत आहेत की भारतीय संस्कृतीकडे एकाच दृष्टीने पाहून नाही. एकांगी विचार करणं योग्य नाही. कारण भारतीय संस्कृती वैविध्याचा संगम आहे. आता यावर आणखी काही उत्तरे नसरीन यांना दिली जातात का? हे पाहणेही महत्त्वाचे असेल.

# हाफकिनला २५ कोटी देण्याचा अर्थमंत्री अजित पवार यांचा निर्णय

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई - औषध निर्मिती क्षेत्रात हाफकिन संस्थेचे मोलाचे योगदान असून देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यामध्ये हाफकिनचा मोठा वाटा आहे. भारत सरकारकडून पोलिओच्या २६८ दशलक्ष मौखिक लसींची मागणी आहे. या लसींची निर्मिती करण्यासाठी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकरातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली.



हाफकिन इन्स्टिट्यूट आणि हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे सक्षमीकरण करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. या समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि नियोजन विभागाच्या सचिवांचा समावेश करावा. या समितीने हाफकीनच्या सक्षमीकरणासाठी ५ वर्षाचा रोडमॅप तयार करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

सध्या हापकिनकडे सर्पदंशावरील दीड लाख लसी तयार आहेत. सर्पदंशावरील हाफकिनने तयार केलेली लस प्रभावी आणि परिणामकारक आहे. या लसींची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने हाफकिनमार्फत करावी, यावी असे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिले.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील समिती कक्षात हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या प्रश्नांसंदर्भात आणि संस्थेतील निवृत्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, विधान परिषद सदस्य सचिन अहिर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, हापकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर, विधि व न्याय विभागाच्या सहसचिव अश्विनी सैनी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सहसचिव रामचंद्र धनावडे उपस्थित होते.

# आसमान फाउंडेशन तर्फे टिळक विद्यालयात कन्या पूजन

स्वर्णभूमी न्यूज

नागपूर - आसमान फाउंडेशन नागपूर तर्फे दरवर्षी प्रमाणे यंदाही लहान मुलींसोबत नवरात्र उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी टिळक प्राथमिक विद्यालय धंतोली येथील गरीब व आर्थिक रूपाने दुर्बल नऊ मुलींचे पूजन केले गेले तसेच पन्नास मुलींना शालेय साहित्य वितरित करण्यात आले. आपल्या उदबोधनात डॉ. रवि गि-हे यांनी आसमान फाउंडेशनच्या माध्यमातून नवरात्रोत्सव शस्त्र म्हणून वही पुस्तक व पेन यांचा वापर करून नरकासुर रुपी अज्ञानाचा अंत केला पाहिजे. कार्यक्रमात फाउंडेशनच्या महिला सदस्य सौ.विभा विंचुरकर, सौ.मेघा गि-हे, उषा जैन, जयश्री बोबडे यांनी नऊ कन्यांचे पूजन केले. याप्रसंगी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवि गिऱ्हे, सचिव नरेश शेंडे, दिनेश टेकाडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा संचालक अध्यक्ष स्वानंद सोनी, योगेश्वर बुटी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभारे, देशपांडे यांचे सहकार्य लाभले.

मुद्रक, प्रकाशक व मालक वैभव रुपराव जोगी यांच्या वतीने मिडिया प्रिन्ट ७९७, मिश्रा किराणा स्टोर्स जवळ, नविन बाबुळखेडा, पार्वती नगर, नागपूर - ४४००२७ येथे मुद्रित करुन दैनिक स्वर्णभूमी, ५५८, नविन बाबुळखेडा, नागपूर - ४४००२७ जिल्हा नागपूर (महाराष्ट्र राज्य) येथून प्रकाशित. **संपादक - बुध्दमाला वैभव जोगी** (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदार) मो. ९४२०२९९१०१ Mail : swarnabhoomidaily@gmail.com